दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ११ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.२९ ऑक्टोबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.





# आमचा जाहीरनामा राज्याच्या प्रगतीचा गेम चेंजर ठरणार ;ना.मुनगंटीवार यांनी व्यक्त केला विश्वास

## बल्लारपूर मतदारसंघ महाराष्ट्रात ठरणार अग्रेसर

**मुल । प्रतिनिधी**

विकासाच्या बाबतीत मुल, पोंभुर्णा, बल्लारपूर हा विधानसभा मतदारसंघ महाराष्ट्रात अग्रेसर आहे. तो कायम अग्रेसर रहावा यासाठी जनता पाठीशी आहे. जनतेच्या सूचनांमधूनच निवडणुकीचा जाहीरनामा तयार करण्यात आलेला आहे. हा जाहीरनामा राज्याच्या प्रगतीचा गेम चेंजर ठरणार आहे, असा विश्वास राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

ना. सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूर विधानसभा क्षेत्राचे भाजपा व महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून सोमवारी (ता.२८) अर्ज भरला. अर्ज दाखल केल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'महाराष्ट्र राज्याच्या विकासाचा आणि प्रगतीचा जाहीरनामा भारतीय जनता पक्ष आणि महायुतीने मांडला आहे. आमचा जाहीरनामा हा केवळ जाहीरनामा नाही तर रयतेचे वचन पत्र आहे. या वचनपत्राला जनताही डोक्यावर घेईल.' राज्यातील महिला भगिनींच्या सक्षमीकरणासाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणली. राज्यातील लाडक्या बहिणी आपल्या लाडक्या भावांचे महायुतीचे सरकार पुन्हा राज्यात आणण्यासाठी भाजपा महायुतीला निवडून देतील हा विश्वास आहे, असेही ना.मुनगंटीवार म्हणाले.

माझ्या मतदारसंघाशिवाय स्टार प्रचार म्हणूनही माझ्यावर पक्षाने मोठी जबाबदारी सोपवली आहे. या मतदारसंघातून जास्तीत जास्त वेळ काढून मी इतर मतदारसंघात प्रचार करणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

राज्याचा सांस्कृतिक मंत्री म्हणून महाराष्ट्र राज्याचे राज्यगीत जाहीर करण्याचे भाग्य लाभले. दिल्लीचेही तक्त राखतो महाराष्ट्र माझा हा विश्वास राज्य गीतातून महाराष्ट्राला दिलेला आहे. त्याच दिल्लीतील



सरकारचे हात बळकट करण्यासाठी महाराष्ट्रात महायुतीचे स्थिर सरकार आम्ही आणणार आहोत, असा विश्वास सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

बल्लारपूर विधानसभा क्षेत्राचा आमदार म्हणून या क्षेत्राचा सामाजिक, आर्थिक आणि पायाभूत सुविधांचा विकास करण्याकडे विशेष भर दिला. विविध समाजाच्या हक्काचे समाजभवन गावागावांमध्ये निर्माण करण्यात आले. ग्रामिण भागातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम आणि बळकट करण्यासाठी ग्रामिण आरोग्य केंद्रांचे आधुनिकीकरण केले. विविध रोजगाराभिमुख प्रकल्पांच्या माध्यमातून क्षेत्रातील गावागावांतील हजारो युवक, महिला, नागरिकांना हक्काचे रोजगार देण्याचेही काम झाले. याशिवाय गावागावांमध्ये रस्ते आणि पुलांचे जाळे निर्माण करून पायाभूत सुविधांना उभारी देण्याचे काम केले. या सर्व कामांमुळे जनतेच्या जीवनात सुलभता आली आहे. त्यामुळे जनता जनार्दन यावेळी देखील खंबीरपणे आपल्या पाठीशी उभी राहिल. केवळ बल्लारपुरमध्येच नव्हे तर संपूर्ण राज्यातील जनता भारतीय जनता पार्टी आणि महायुतीच्या पाठीशी राहिल, असाही विश्वास ना.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

## स्वीप उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी
### मतदान जनजागृतीसाठी नियोजन

**वर्धा । प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी स्वीप उपक्रमांतर्गत जिल्ह्यात विविध उपक्रम राबवले जात आहेत. या उपक्रमांचा आढावा घेऊन पुढील नियोजन करण्याच्या सूचना स्वीपचे नोडल अधिकारी डॉ. मंगेश घोगरे यांनी तालुकास्तरीय नोडल अधिकाऱ्यांच्या बैठकीत दिल्या.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीला सहाय्यक नोडल अधिकारी उत्तम खरात आणि संजय नवले उपस्थित होते.




डॉ. मंगेश घोगरे यांनी उपस्थितांना निवडणूक साक्षरता क्लब, मतदार जनजागृती क्लब, चुनाव पाठशाला, बूथ लेवल अवेअरनेस ग्रुप, आणि कॅम्पस अँबेसिडर यांसारख्या उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी या उपक्रमांची अंमलबजावणी कशा पद्धतीने करायची याबद्दल सखोल चर्चा केली.

सदर बैठकीत त्यांनी मतदार जागरूकतेसाठी स्थानिक पातळीवर जाहिरात, होर्डिंग, बॅनर, आणि पोस्टर्स यांसारख्या विविध माध्यमांचा वापर करण्यास सांगितले. जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदा व ग्रामपंचायतींमध्ये मतदानाचे महत्त्व सांगणारे उपक्रम आयोजित करण्याचे निर्देश दिले. त्यांनी जिल्ह्यातील रेल्वे, पोस्ट, बँक यांसारख्या केंद्रीय कार्यालयांशी समन्वय साधून प्रचार करण्याबाबतही सूचना दिल्या. आगामी काही दिवसांमध्ये ठरविलेल्या उपक्रमांची अंमलबजावणी कशा पद्धतीने करावी याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यशाळेसाठी सर्व विधानसभा क्षेत्र निहाय तालुकास्तरीय नोडल अधिकारी उपस्थित होते.



## दौंड तालुक्यातील वरवंड कौठीचा मळा येथे भीषण अपघात: दोन ठार,४० ते ४५ जखमी

**योगेश राऊत । पाटस**

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर वरवंड कौठीचा मळा येथे दोन एसटी बसच्या जोरदार धडकेत भीषण अपघात झाला. या अपघातात सुवर्णा संतोष होले (वय ३८, बिरोबावाडी, दौंड, पुणे) आणि नामदेव आढाव (वय ७०, काष्टी, श्रीगोंदा, नगर) यांचा मृत्यू झाला, तर दोन्ही बसमधील ४० ते ४५ प्रवासी जखमी झाले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जामखेड ते स्वारगेट एसटी बस पुणे दिशेने जात असताना, एक मोटरसायकल आडवी आल्याने बसचालकाने त्या चालकाला वाचवण्यासाठी वाहन बाजूला घेतले. त्यामुळे बसचा ताबा सुटला आणि ती दुभाजक तोडून विरुद्ध दिशेला गेली. या वेळी समोरून येणाऱ्या पुणे-तुळजापूर बसला धडक दिली. हा अपघात सोमवारी (दि. २८) दुपारी एक ते दीड वाजण्याच्या सुमारास पाटस आणि वरवंडजवळ कवठीचा मळा येथे घडला.

या अपघातात मोटर सायकल चालक वाचला, मात्र बसमधील ४० ते ४५ प्रवासी जखमी झाले. जखमी प्रवाशांना वरवंड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, चौफुला व दौंड येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. उपचारादरम्यान सुवर्णा होले आणि नामदेव आढाव या दोघांचा मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच पाटस पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक सलीम शेख, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक भानुदास बंडगर आणि अन्य कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमी प्रवाशांना ग्रामस्थांच्या मदतीने बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातात दोन्ही एसटी बस समोरासमोर धडकल्याने मोठे नुकसान झाले असून, या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

## परप्रांतीय मेंढपाळ्याला गुराखी व त्याच्या मालकाकडून लाठीकाठीने बेदम मारहाण
### परसोडी मार्गावरील उड्डाणपूलावरील घटना;मारहाणीत मेंढपाळक गंभीर जखमी
### दोन आरोपींविरुद्ध सिंदी पोलिसात गुन्हा दाखल

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

ड्रायपोर्ट परिसरात मेंढी का चारली या कारणावरून गुराखी व त्याच्या मालकाने परप्रांतीय मेंढपाळ्याला लाठीकाठीने बेदम मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना रविवारी दिनांक २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी परसोडी मार्गावरील ड्रायपोर्ट परिसरात घडली. भूषण बेलखोडे वय २५ वर्ष व प्रशांत जनार्धन बेलखोडे वय ३४ वर्ष दोन्ही राहणार वार्ड नंबर १६ सोनामाता मंदिर सिंदी (रेल्वे) ता. सेलू जिल्हा वर्धा असे मारहाण केलेल्या आरोपींची नावे असून गोकुलभाई पबाभाई रबारी वय ३८ वर्ष राहणार धानेती ता. जिल्हा भुज (गुजरात) असे जखमी मेंढपाळ्याचे नाव आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध सिंदी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार परप्रांतीय मेंढपाळ गोकुलभाई रबारी व राणा वेला रबारी हे रविवारी दिनांक २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास परसोडी मार्गावरील ड्रायपोर्ट परिसरात मेंढी चारत होते. दरम्यान, त्याच ठिकाणी गुराखी भूषण बेलखोडे हा सुद्धा गाई चारत होता. परिणामी, याठिकाणी मेंढी चारायला का आणली, ही आमची जनावरे चारायची जागा आहे असे म्हणत गुराखी भूषण बेलखोडे याने फिर्यादी मेंढपाळक गोकुल रबारी यांच्यासोबत अकारण वाद घातला. एवढेच नाही तर रबारी यांना अश्लील शिविगाळ केली. यावेळी मेंढपाळ्याने शिविगाळ करू नको, आम्ही येथून निघून जातो असे म्हणून परसोडी मार्गावरील उड्डाणपूलावर आले. मात्र, गुराख्याने त्याचा मालक प्रशांत बेलखोडे याला फोन करून घटनास्थळी बोलाविले. प्रशांत बेलखोडे हा उड्डाणपूलावर येताच आरोपी भूषण बेलखोडे व प्रशांत बेलखोडे यांनी हातातील लाठीकाठीने रबारी यांना अमानुषपणे बेदम मारहाण केली. या मारहाणीत रबारी हा गंभीर जखमी होऊन रक्तबंबाळ झाला. दोन्ही आरोपी एवढ्यावरच थांबले नाही तर लाठीकाठीने पायावर वार केले. त्यामुळे रबारी यांचे दोन्ही पाय फॅक्चर झाले आहे. यावेळी रस्त्याने जाणाऱ्या काही नागरिकांनी मध्यस्थी केल्याने सुदैवाने मेंढपाळक रबारी यांचे प्राण वाचले. या घटनेची फिर्याद रबारी यांनी सायंकाळी ८ वाजता सिंदी पोलिसात दिली. याप्रकरणी प्राथमिक मेडिकल रिपोर्टवरून सिंदी पोलिसांनी आरोपी प्रशांत जनार्धन बेलखोडे व भूषण बेलखोडे यांच्याविरुद्ध कलम ११८(१), ३५२ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला असून रबारी यांचे दोन्ही पाय फॅक्चर असल्याने सिंदी येथील डॉक्टरांनी त्यांना सेलू येथील सामान्य रुग्णालयात रेफर केल्याचे पोलीस हवालदार आनंद भस्मे यांनी बोलतांना सांगितले.


## नागपूर-यवतमाळ हायवेवर अपघात: भरधाव ट्रकच्या धडकेत बिबट्या वाघाचा मृत्यू

**केळझर । प्रतिनिधी**

सकाळी सुमारे ५.५० वाजता नागपूर-यवतमाळ हायवेवर केळझर येथे एक दुर्दैवी अपघात घडला. भरधाव ट्रकच्या धडकेत एक बिबट्या वाघ जागीच ठार झाला. हा अपघात वन विभागाच्या जंगला केलेल्या कपाऊड बैटरी करंट तारांच्या कारणामुळे झाला.

हायवेच्या कडेला असलेल्या जंगलात लावलेल्या तारांनी अचानक खाली पडल्यानंतर जंगली प्राणी बाहेर पडले, ज्यामुळे हा अपघात घडला. जर ही तार व्यवस्थित असती, तर जंगलातले प्राणी बाहेर येणार नसते आणि हा अपघात टाळला गेला असता.

बिबट्या वाघाचा अपघात गावच्या शेजारी झाला असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. जंगली प्राणी गावात येण्याचे लक्षात



आले आहे, त्यामुळे गावकऱ्यांमध्ये चिंतेचा माहौल आहे. वन विभागाने या अपघाताची गंभीर दखल घेतली पाहिजे आणि भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.

# विधानसभा निवडणुकीत आतले आणि बाहेरचे

**आपल्यालाच पक्षाचे अधिकृत तिकीट मिळेल अशी वाट पाहिली. परंतु अनेक पक्षांनी ऐनवेळी बाहेरून आलेल्यांना उमेदवारी दिल्याने पक्षाची प्रामाणिक सेवा करणाऱ्यांवर अन्याय झाला. काही पक्षात उमेदवारी मागणाऱ्यांची संख्या अधिक असल्याने असंतुष्टांनी शेवटच्या दिवशी अपक्ष म्हणून फॉर्म भरण्याची तयारी केली. जवळपास सर्वच पक्षात काही कार्यकर्ते आत आले तर काही कार्यकर्ते पक्ष सोडून बाहेर गेले आहे.आज शेवटच्या दिवशी उमेदवारी फॉर्म भरण्यासाठी गर्दी बघता आमदार होण्यासाठी आतले आणि बाहेरचे निर्णायक भूमिका बजावतील असे एकंदरीत वातावरण निर्माण झाले आहे.**

विधानसभा निवडणुकीची धामधूम जोरात सुरू आहे. एकीकडे दिवाळीचे फटाके फुटत आहे तर दुसरीकडे निवडणुकीचे वारे जोराने वाहत असल्याने तिकडेही उमेदवारांचे जोरात फटाके फोडणे सुरू आहे. विविध अधिकृत पक्षात आलाआला गेलागेला असे वातावरण झाले आहे. अनेक कार्यकर्ते इकडचे तिकडे आणि तिकडचे इकडे पक्षांतर करत आहे. पक्षांतराला जणू भरती आली आहे. बरेचजण ज्या पक्षाची पाच वर्षे प्रामाणिकपणे सेवा केली. सतरंज्या उचलल्या. त्याच पक्षाला सोडून नवख्या पक्षाचा हात धरत आहे. सगळीकडे पळवापळवी सुरू आहे. राजकीय प्रतिस्पर्धी एकमेकांना फटाके लावत आहे. काही फटाके धडाम असा जोरदार आवाज करत आहे. अनेक फुसके बारही उडत आहे असा हा फटाक्यांचा सध्या माहौल सुरू आहे. फटाके दिवाळीचे असो की, राजकीय कार्यकर्त्यांचे. शेवटी वाजणे न वाजणे हे माणसांच्या हातामध्ये आहे. आज विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी फॉर्म भरण्याचा शेवटचा दिवस आहे. कालपर्यंत अनेकांनी आपल्यालाच पक्षाची अधिकृत उमेदवारी मिळेल अशी आस लावून ठेवली होती. पैकी अनेकांच्या वाट्याला अखेरच्या क्षणी निराशा आली. हे स्वाभाविकच आहे. पक्षाकडे तिकीट एक असते आणि मागणारे अनेक असतात. त्यामुळे कोणत्याही एकाच्या चेहऱ्यावर हास्य फुलणार. उर्वरित अनेकांच्या चेहऱ्यावर निराशेची मरगळ उमटणार हे काही नवीन नाही. हे नैसर्गिक तत्व आहे. खरं म्हणजे प्रत्येकालाच आमदार बनावे असे वाटते. एकदा आमदार बनल्यानंतर त्या पदापासून होणारी भरभराट अनेकांना आकर्षित करत आहे. सात पिढ्यांचे भले करण्याची क्षमता आमदारकीत आहे असे अनेकांना वाटते.जे काही फायदे असतात ते मिळविण्यासाठी अनेकांना आमदारकी आपल्याच गळ्यात पडावी असा मोह वाटतो. परंतु पक्षीय धोरणानुसार कुठल्या एकालाच ते बनवणे शक्य असल्याने उर्वरितांना शांत बसल्याशिवाय पर्याय नाही. पक्षामध्ये अनेक कार्यकर्ते इच्छुक असतात. आपल्या पक्षाचे, आपले नांव तळागाळात पोचवण्यासाठी अनेकांनी आपल्या जवळचा पैसा लावून पक्ष वाढवला आहे. पक्षाचे चिन्ह घरोघरी पोहोचवले. आपली स्वतःचीही प्रतिमा सामाजिक कार्यकर्ते म्हणून समाजात निर्माण केली. परंतु एवढे करूनही अनेकांना तिकीट मिळविण्याचे स्वप्न साकार करता आले नाही. ही नाराजी पक्षांतर करून व्यक्त केली. अनेकांनी आयुष्यभर ज्या पक्षाची सेवा केली आहे त्या पक्षाचे विधानसभा तिकीट ऐनवेळेवर येणाऱ्या आयतोबांना दिल्याने निष्ठावंत कार्यकर्त्यांवर अन्याय झाला आहे असे त्यांना वाटते. पैकी काहींनी बंड केले. पैकी काहीजण अपक्ष म्हणून आज फार्म भरतीलही. शेवटचा दिवस असल्याने आमदार होऊ इच्छिणारे अनेक हौशी कार्यकर्ते आज फार्म भरण्यासाठी रांगेत लागतील. बऱ्याचजणांनी सोयीनुसार पक्षाप्रति निष्ठा बदलून आपली टोपी फिरवली आहे. टोपीची अदलाबदली केली आहे. अलीकडे राजकारणाच्या सगळ्या व्याख्या बदलून गेल्या आहे. अलीकडे राजकारण म्हणजे केवळ मी आणि केवळ मीच असे व्यक्तिकेंद्रित झाले आहे. अनेकांना मी आहो म्हणून पक्ष जिवंत आहे असा भास व्हायला लागला आहे. पूर्वी पक्ष आहे म्हणून मी आहे ही भूमिका असायची. कार्यकर्ते पक्षाप्रती प्रामाणिक असायचे. अलीकडे सगळे बदलले आहे.आता मी आहे म्हणून पक्ष आहे या भूमिकेमुळे कित्येकजण पक्षाकडून समाधानकारक वागणूक मिळाली नाही की लगेच पक्षांतर करून मोकळे होतात. बरे जातात तर जातात निदान समविचारी पक्षात तरी जायला पाहिजे ना. प्रत्येक पक्षाची ध्येयधोरणे वेगवेगळी




असतात. विचारधारा वेगवेगळ्या असतात. समांतर विचारधारेच्या पक्षामध्ये गेले तर त्याचे काही फारसे नवल वाटणार नाही . परंतु काही नेत्यांनी असेही पक्ष निवडले की ज्या पक्षाच्या विचारधारा त्यांनी आजवर आयुष्यभर ज्या पक्षात काम केले त्या पक्षाच्या अगदी विरुद्ध आहे. कुठेच वैचारिक ताळमेळ जुळत नाही. अगदी परस्पर विरुद्ध विचारधारा आहे. केवळ तिकीट मिळाले म्हणून कुठेही जायचे. कुठल्याही पक्षामध्ये मांडीला मांडी लावून बसायचे हे काही बरोबर नाही. काय करणार जसे वर सुरू आहे तसे इकडे. दिल्लीतल्यांचे अनुकरण गल्लीतले करतात. आपल्यापेक्षा वयाने, पैशाने, पदाने मोठी असलेली माणसे काय करतात याकडे सर्वसामान्य माणसांचे लक्ष असते. समाजातील ही उच्चपदस्थ नेते मंडळी ज्याप्रकारे वर्तन करतात त्याचे अनुकरण सामान्य जनता करत असते. ज्याच्याकडं तत्त्वांचे पालन आणि योग्य वागणूक अशी अपेक्षा असते तेच जर एका रात्रीत पक्षांतर करून दुसरीकडे घरोबा करत असेल.आपल्या विचाराची नाळ न जुळणाऱ्या पक्षाशी तडजोड करत हात मिळवत असेल तर यांच्यापासून सामान्य जनतेने काय शिकावे? हाही मोठा प्रश्न आहे. केवळ सत्तेसाठी आपल्या तत्त्वांशी प्रतारणा करून स्वतःचीच प्रगती साधणे म्हणजे राजकारण होत असेल तर हे निकोप लोकशाहीसाठी काही चांगले लक्षण नाही. सामान्य माणसे जेवढ्या प्रामाणिकपणे तत्व पाळतात. तेवढ्या प्रामाणिकपणे नेते मंडळी पाळत नाही हे या निमित्ताने दिसतं आहे. केवळ तिकीट मिळविणे हेच जर समाजसेवेचे मुख्य स्वरूप असेल तर पुढे येणाऱ्या काळामध्ये पक्षनिष्ठा कायम राहील असे वाटत नाही. दुसरे म्हणजे ज्या कार्यकर्त्याने पाच वर्षे पक्षाची प्रामाणिक सेवा केली. त्यांना पक्षाने उमेदवारी देणे हा नैसर्गिक न्याय आहे. पक्षाने त्यांनाच प्राधान्य द्यायला पाहिजे. दुर्दैवाने अनेक पक्षांनी अगदी वेळेवर येणाऱ्या उपटसुंभ कार्यकर्त्यांना पक्षाची अधिकृत उमेदवारी देऊन आपले बौद्धिक दिवाळखोरीपण दाखवले आहे. केवळ निवडून येण्याची क्षमता आहे म्हणून जर ऐनवेळी येणाऱ्या आयतोबांना उमेदवारी देण्याची परंपरा सुरू झाली तर उद्या प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या मनावर त्याचा विपरीत परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. पक्षनेतृत्वाकडून मिळणारे हे संदेश अतिशय चुकीचे आहे. निवडणुका जिंकण्यापेक्षा पक्षाचे वैचारिक अधिष्ठान कोण पुढे नेईल हे बघणे महत्त्वाचे आहे. निवडणुका काय येतात जातात, सत्ता येते जाते हे महत्त्वाचे नाही. परंतु परिश्रम करणाऱ्या कार्यकर्त्यांची कदर झालीच पाहिजे. जर ती केली जात नसेल तर हे लोकशाहीसाठी घातक प्रथा ठरेल. असेच जर पुढेही चालत राहिले तर कोणीही पक्ष संघटन मजबूत करण्याकडे लक्ष देणार नाही. परिणामी पक्षाची विचारधारा सामान्य लोकांपर्यंत पोहोचणार नाही. पक्षहीत लक्षात घेता केवळ आणि केवळ निवडणुकीवर डोळा ठेवून पक्ष प्रवेश करणाऱ्यांना पक्षश्रेष्ठींनी लगाम लावला पाहिजे. निवडणुकीचा फार्म भरण्याच्या आज शेवटच्या दिवशी महाराष्ट्रात सगळीकडे वातावरण बघता सर्वसामान्य लोकांच्या मनात या लोकशाहीप्रति प्रेम निर्माण होण्याऐवजी विविध प्रश्न निर्माण होत आहे. वेळेवर अनेकांनी पक्षाचे तिकीट मिळविले आणि अधिकृत उमेदवार म्हणून घोषित झाले. आता ऐनवेळी आलेल्या पाहुण्या कार्यकर्ता रात्रीत नेता झाला आणि पाच वर्षे सतरंज्या उचलणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या उरावर बसणार आहे. ज्यांनी मेहनत केली ते बाजूलाच अन ऐनवेळी पक्षात घुसखोरी करणारे नेते म्हणून मिरवणार. मनामध्ये इच्छा असो किंवा नसो पक्षीय काम करणे हे त्यांचे कर्तव्ये ठरणार आहे. परंतु हा नैसर्गिक न्याय नाही हे खेदाने सांगावेसे वाटते. अशा या ऐनवेळी आलेल्या आयतोबा उमेदवारांना प्रामाणिक कार्यकर्ते कशा पद्धतीने कौल देणार हे आज सांगता येत नाही.

## राज्यस्तरीय शालेय वूशू स्पर्धेत मूलच्या प्रीती भंडारेचे कांस्य पदक

**मूल । प्रतिनिधी**



क्रीड़ा व युवक सेवा संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीड़ा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीड़ा परिषद नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथील जिल्हा क्रीडा संकुल इनडोअर हॉलमध्ये राज्यस्तरीय शालेय वूशू क्रीड़ा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत नागपूर, कोकण, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या विभागांचा सहभाग होता.

मूल येथील नवभारत कन्या विद्यालयाची प्रीती नीलकंठ भंडारे हिने १७ वर्षाखालील वयोगटात आणि -४५ किलो वजनगटात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत कांस्य पदक पटकावले आहे. प्रीतीच्या या यशामुळे मूल तालुक्याचे क्रीडा क्षेत्रात नाव उंचावले आहे.प्रीतीला वूशू प्रशिक्षक निलेश गेडाम यांचे मार्गदर्शन असून ती कराटे अँड फिटनेस क्लब, मूल येथे प्रशिक्षण घेत आहे. तिच्या विजयावर नवभारत कन्या विद्यालय, मूलचे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, अन्य शिक्षकवृंद, कराटे अँड फिटनेस क्लबचे संचालक आणि प्रशिक्षक इम्रान खान तसेच तिच्या पालकांनी आनंद व्यक्त केला असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.


## वर्ध्यात निवडणूक निरीक्षक जयप्रकाश सिंग दाखल:जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वागत

**वर्धा । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने ४४-आर्वी आणि ४५-देवळी विधानसभा मतदारसंघासाठी नियुक्त केलेले निवडणूक निरीक्षक जयप्रकाश सिंग वर्ध्यात दाखल झाले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

जयप्रकाश सिंग हे २०१३ तुकडीचे भारतीय प्रशासन सेवा (ख-ड) अधिकारी असून, सध्या बिहार कॅडरचे सचिव आहेत. निवडणूक प्रक्रियेतील त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेमुळे आर्वी आणि देवळी विधानसभा मतदारसंघातील निवडणूक तयारीला वेग येण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.






**दिपावली च्या पहिला दिवस हा वसुबारस म्हणून साजरा केला जातो .सौ.भाग्यश्री भुपेश चव्हाण यांनी घरासमोर रांगोळी मध्ये सुरेख अशी गाय आणि वासरूचे चित्र तयार केले आहे.ही रांगोळी बघण्यासाठी परिसरातील रहिवाशी यांनी गर्दी केली होती.**

## शब्द न पाळल्याने श्रीनिवास वनगा निराशेत, आत्महत्येचा विचार - कुटुंबीयांची माहिती

**पालघर । मनोज उतेकर**

महायुतीत पालघरची जागा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून राजेंद्र गावित यांना देण्यात आली आहे, तर याच जागेसाठी श्रीनिवास वनगा यांना उमेदवारी नाकारल्याने ते डिप्रेशनमध्ये गेले असल्याची माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बंडामध्ये सहभागी असलेल्या ३९ आमदारांना उमेदवारी देण्यात आली, मात्र पालघरचे आमदार श्रीनिवास वनगा यांना या यादीत स्थान न मिळाल्याने ते निराश आहेत.

वनगा यांची पत्नी सुमन वनगा यांनी सांगितले की,



श्रीनिवास वनगा यांच्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त एकनाथ शिंदे पालघरकडे गेले होते, त्यावेळी त्यांनी वनगा यांना घरी बसणार नाही असा शब्द दिला होता. परंतु आता तो शब्द पाळला गेला नाही. वनगा यांनी अन्नपाणी त्याग केले असून ते मानसिकदृष्ट्या खचले आहेत. आत्महत्येचा विचार करीत असल्याची माहिती सुमन वनगा यांनी दिली. माझ्या पतींनी पालघरमध्ये प्रामाणिकपणे काम केले, परंतु त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली नाही. उद्धव साहेब आमच्यासाठी देव होते, परंतु एकनाथ शिंदे साहेबांवर ठेवलेला विश्वास चुकला, असे त्यांनी सांगितले. सुमन वनगा यांनी थेट मुख्यमंत्री शिंदे यांना प्रश्न विचारत म्हटले, श्रीनिवास वनगा यांचा काही अनुचित घडल्यास जबाबदार कोण?

## अकोले येथे २ हजार अधिकारी - कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

**अकोले । प्रतिनिधी**

अकोले विधानसभा मतदारसंघातील २ हजार ३९ अधिकारी-कर्मचाऱ्यांना निवडणूक निर्णय अधिकारी अनुपसिंह यादव व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सिद्धार्थ मोरे यांच्या उपस्थितीत निवडणूक विषयक प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणामध्ये प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी प्राधान्याने करावयाच्या अनिवार्य बाबी, ईव्हीएमची वाहतूक, मतदान केंद्रांची रचना, केंद्रावरील सुरक्षाव्यवस्था, मतदान यंत्रे हाताळणीबाबत असलेल्या तांत्रिक बाबी, मतदानाच्या दिवशी मतदान प्रक्रिया पार पाडत असताना सर्व यंत्रे सुरळीतपणे कार्यान्वित आहेत किंवा नाही याची खातरजमा करणे आदी विषयांबाबत माहिती देण्यात आली. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक मतदारांसाठी करावयाची कार्यवाही, मतदान प्रकिया सुरू होण्यापूर्वी





उमेदवारांच्या प्रतिनिधींसमोर प्रत्यक्ष मतदानाआधी अभिरूप मतदान घेणे, अभिरूप मतदान प्रकियेच्या सुरुवातीपासून ते प्रक्रिया संपन्न होईपर्यंतच्या कामकाजाविषयीदेखील मार्गदर्शन करण्यात आले.

निवडणूक प्रक्रियेत मतदान हा एक महत्त्वाचा टप्पा असतो. हा टप्पा अधिक बिनचूक व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे. निवडणूक यंत्रणेतील विविध घटकांना या प्रशिक्षणामुळे निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक व बिनचूक पार पाडण्यासाठी फायदा होईल, असे निवडणूक निर्णय अधिकारी अनुपसिंह यादव यांनी सांगितले.


प्रशिक्षण सत्र यशस्वितेसाठी निवासी नायब तहसीलदार किसान लोहारे, महसूल नायब तहसीलदार प्रमोद सावंत, निवडणूक नायब तहसीलदार दत्तू वाघ, नायब तहसीलदार मार्तंड माळवे तसेच उपविभागीय अधिकारी व तहसील कार्यालयातील अधिकारी - कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले

## खांबेवाडी येथे गोमतेच्या पूजनाने वसुबारस साजरी

**सोलापूर । प्रतिनिधी**

श्री संत ज्ञानेश्वर माऊली गोशाळा, खांबेवाडी येथे वसुबारस निमित्ताने राजमाता गोमातेची गोग्रास नैवेद्य अर्पण करून विधिवत पूजा करण्यात आली. महाराष्ट्र राज्य शासनाने गोमातेला 'राजमाता' दर्जा दिल्यामुळे गोभक्तांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. श्रीकृष्ण भगवान आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी गोमातेची पूजा केली होती, त्याच भावनेतून संपूर्ण महाराष्ट्रातील गोशाळांमध्ये राजमाता गोमातेचे विधिवत पूजन होत आहे. यानिमित्त खांबेवाडीतील श्री संत ज्ञानेश्वर माऊली गोशाळेतही राजमाता कामधेनु या गोमातेचे पूजन करण्यात आले.

या पूजेसाठी गोभक्त हभप अण्णासाहेब सुपनवर, हभप लता अण्णासाहेब सुपनवर, अश्विनी बापू लांडगे, हभप भारत लांडगे, हभप अंकुश लांडगे, महिला युवा कीर्तनकार गायन कोकिळा हभप ज्ञानेश्वरी सुपनवर, महाराष्ट्र चॅम्पियन महिला कुस्तीगीर पल्लवी सुपनवर, राजेंद्र वाघमोडे, पृथ्वीराज कांबळे, पैलवान बाळराजे सुपनवर, वैष्णवी लांडगे



आणि धनंजय लांडगे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

राजमाता गोमातेचे महत्त्व समाजाला कळाल्याने भक्तिभावाने गोमातेची पूजा करून गोग्रास अर्पण करण्यात आला.

# ही लढाई स्वाभिमानी महाराष्ट्राच्या अस्मितेची-माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल

## छत्रपती शिवरायांचा अपमान करणाऱ्या कमिशनखोरांना धडा शिकवा ;मी सदैव तुमच्या सुख दुःखाचा साथी - विजय वडेट्टीवार

### जनसेवा व संपूर्ण क्षेत्र विकासाकरिता पुन्हा एकदा संधी द्या;आयोजित सभा व महारॅलीत हजारोंच्या संख्येने नागरिकांची उपस्थीती





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

या महाराष्ट्र राज्याशी आमच्या छत्तीसगड राज्याचे अतिशय जवळचे नाते आहे. संतांच्या या पावन भूमीला, छत्रपती शिवाजी महाराज,थोर क्रांतिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, यांचा वारसा लाभला. मात्र महाराष्ट्र द्रोही भाजपवाल्यांनी सत्ता कारणासाठी महाराष्ट्र संस्कृतीला बदनाम केले. तसेच महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवरायांच्या पुतळा निर्मिती कार्यातही कमिशन खोरी केली. अशा महापापी सत्तापिपासुंना त्यांची जागा दाखविण्यासाठी आपण सजग राहावे. ही लढाई स्वाभिमानी महाराष्ट्राच्या अस्मितेची आहे. असे प्रतिपादन छत्तीसगड राज्याची माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी केले. ते महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या नामांकन दाखल प्रसंगी ब्रम्हपुरी येथे आयोजित सभेत बोलत होते.

आज महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते तथा ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार यांनी ब्रह्मपुरी येथील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात नामांकन दाखल केले. तत्पूर्वी पार पडलेल्या सभेस छत्तीसगड राज्याचे माजी मुख्यमंत्री भूपेंश बघेल, काँग्रेस तथा महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार विजय वडेट्टीवार, गडचिरोली - चिमुर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव कीरसान, काँग्रेसचे ओझा, प्रदेश युवक काँग्रेस सरचिटणीस शिवानी वडेट्टीवार,बल्लारपूर - मुल विधानसभा क्षेत्र उमेदवार संतोषसिंह रावत, ड, राम मेश्राम, संदिप गड्डमवार, प्राचार्य जगनाडे, खेमराज तिडके, प्रभाकर सेलोकार,डॉ.राजेश कांबळे,विलास विखार,दिनेश चिटनुरवार, प्रमोद चिमूरकर, रमाकांत लोधे, नितिन गोहने, आदिवासीं नेते अवचितराव सयाम, ड. गोविंद भेंडारकर, धीरज शेडमाके, यशवंत दिघोरे, तसेच महिला आघाडी, युवक काँग्रेस, एनएसयुआय, तथा काँग्रेस पक्षाच्या सर्व सेल व फ्रंटल ऑर्गनायझेशनचे पदाधिकारी, महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्ष यांची पदाधिकारी व हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

यापुढे बोलताना छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल म्हणाले की, महाराष्ट्रातील काही भाजपवाल्यांनी सत्ता प्राप्तीसाठी आमदारांचा बाजार भरवून खोके देऊन त्यांची खरेदी केली. इथले उद्योग पळविल्या गेले. प्रचंड बेरोजगारी व महागाईचा जनतेला सामना करावा लागत आहे. हे महायुतीचे प्रचंड मोठे पाप असून महाराष्ट्रातील महायुती ही महाराष्ट्र द्रोही आहे अशी टीकाही त्यांनी यावेळी केली. तर संविधान वाचवण्यासाठी महाराष्ट्र सुपुत्र विजय वडेट्टीवार यांनी विरोधी बाकावर बसून किल्ला लढविला. या महाराष्ट्राने लोकसभेत मोदींना पराभवाची धूळ चारून ट्रेलर दाखविला आगामी विधानसभेत या महायुतीला संपूर्ण पिक्चर दाखवा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यानंतर राज्याचे विरोधी पक्ष नेते काँग्रेसचे तसेच महाविकास आघाडीचे ब्रह्मपुरी विधानसभेचे उमेदवार विजय वडेट्टीवार यांनी आपल्या भाषणातून केलेल्या विविध विकास कामांचा आढावा दिला. तसेच भाजपात एकनिष्ठ व्यक्तींची काय गत होते यावर बोलतं माजी आमदार देशकरांना मिळालेले महामंडळाचे उपाध्यक्ष पद याचे उदाहरण दिले. यावेळी बोलताना ते म्हणाले की मी सामान्यातून आलेला माणूस म्हणूनच सामान्यांची वेदना जाणतो. मी क्षेत्रातील जनतेच्या प्रत्येक सुखा दुःखात सहभागी होऊन आज विजयकिरण फाउंडेशनच्या माध्यमातून प्रथम स्तरावरील कर्करोग निदान करणाऱ्या फिरत्या दवाखान्यातून हजारो रुग्णांचे प्राण वाचविले. क्षेत्रात रस्ते, विज व शेतीसाठी मुबलक पाणी यासह अनेक लोक उपयोगी कार्य केले. लाडकी बहीण योजना ही महायुतीची दिशाभूल करणारी चाल असून आम्ही सत्तेत आल्यास लाडकी बहीण योजनेच्या तसेच घरकुल निधीत दुपटीने वाढ करू. आपण सतत मला प्रेम दिले. यावेळी उर्वरित क्षेत्राचा विकास व जन समस्याचे समूळ निराकरण करण्याकरिता जनसेवेची पुन्हा एकदा संधी द्या असे आवाहनही विजय वडेट्टीवार यांनी यावेळी केले. तर लोकसभेत ज्या पद्धतीने आपण संविधान वाचवण्यासाठी भरभरून साथ दिली अगदी त्याचप्रमाणे येणाऱ्या विधानसभेतही महाविकास आघाडीच सर्व उमेदवारांना निवडून द्या असे आवाहन उपस्थितांना गडचिरोली - चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव कीरसान यांनी केले. यानंतर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पटांगण ते उपविभागीय अधिकारी कार्यालया पर्यन्त महारॅली काढून नामांकन दाखल करण्यात आले. यावेळी ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रांतील सावली, सिंदेवाही, ब्रम्हपुरी टाक्यातील हजारोंचा संख्येने जनसमुदायाने लक्षणीय हजेरी लावली होती.

# जिल्ह्यात सोमवारी ५७ उमेदवारांचे नामांकन अर्ज दाखल

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी सोमवारी (दि.२८) चंद्रपूर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघात एकूण ५७ उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले.

७०- राजुरा विधानसभा मतदारसंघात प्रिया बंडू खाडे (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया), निनाद चंद्रप्रकाश बोरकर (अपक्ष), सुभाष रामचंद्र धोटे (भारतीय राष्ट्रीय कांग्रेस), संजय यादवराव धोटे (भारतीय जनता पार्टी आणि अपक्ष), चित्रलेखा कालिदास धंदरे (अपक्ष), सुदर्शन भगवान निमकर (भारतीय जनता पार्टी आणि अपक्ष), देवराव विठोबा भोंगळे (भारतीय जनता पार्टी), सचिन बापूराव भोयर (महाराष्ट्र नवनिर्माण सेना), गजानन गोदरू पाटील जुमनाके (गोंडवाना गणतंत्र पार्टी), प्रवीण रामराव कुमरे (बहुजन मुक्ती पार्टी) आणि वामनराव सदाशिव चटप (स्वतंत्र भारत पक्ष) यांनी नामांकन अर्ज दाखल केले.

७१ - चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात सुरेश मल्हारी पाईकराव (अपक्ष), राजेश भीमराव घुटके (अपक्ष), जोरगेवार किशोर गजानन (भारतीय जनता पार्टी), प्रियदर्शन अजय इंगळे (राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी व अपक्ष), प्रवीण नानाजी पडवेकर (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), मिलिंद प्रल्हाद दहिवले (केंद्रीय मानवाधिकार संगठन व अपक्ष), ज्ञानेश्वर एकनाथ नगराळे (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया-अ), भानेश राजम मातंगी (अपक्ष) आणि भुवनेश्वर पद्माकर निमगडे (अपक्ष) यांचा समावेश आहे.

७२- बल्लारपूर विधानसभा मतदारसंघात किशोर बंडू उईके (अपक्ष), संजय नीलकंठ गावंडे (अपक्ष), रामराव ओंकार चव्हाण (अपक्ष), निशा शीतलकुमार धोंगडे (अपक्ष), राजू देवीदास जांभुळे (अपक्ष), सतीश मुरलीधर मालेकर (वंचित बहुजन आघाडी), कुणाल पुरुषोत्तम गायकवाड (अपक्ष), सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार (भरतीय जनता पार्टी), अरुण देवीदास कांबळे (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया रिफॉर्मिस्ट) आणि अभिलाषा राकेश गावतुरे (अपक्ष) यांचा समावेश आहे.

७३ - ब्रम्हपूरी विधानसभा मतदारसंघात विनोद अंबादास नवघडे (अपक्ष), कृष्णा सहारे (भारतीय जनता पार्टी), वसंत वर्जूर्कर (अपक्ष), अनंता भोयर (पीपल्स पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटिक).

७४ - चिमूर विधानसभा मतदारसंघात अरविंद आत्माराम चांदेकर (वंचित बहुजन आघाडी), अनिल अंबादास घोंगळे (अपक्ष), सतीश वारजुकर (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), हेमंत गजानन दांडेकर (अपक्ष), धनंजय मुंगले (अपक्ष), कैलास श्रीहरी बोरकर (अपक्ष), प्रकाश नान्हे (अपक्ष), डॉ. हेमंत सुखदेव उरकुडे (अपक्ष).

७५ - वरोरा विधानसभा मतदारसंघात प्रवीण सुरेश काकडे (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), विनोद कवडूजी खोब्रागडे (अपक्ष), अमोल दिलीप बावणे (अपक्ष), राजू मारोती गायकवाड. (अपक्ष), जयवंत नथ्थुजी काकडे (अपक्ष), जयंत मोरेश्वर टेमुर्डे (अपक्ष), अहेतेशाम सदाकत अली (प्रहार जनशक्ती), श्रीकृष्ण धुमदेव दडमल (अपक्ष), रंजना मनोहर पारशिवे (अपक्ष), करण संजय देवतळे (भारतीय जनता पार्टी), मुकेश मनोज जिवतोडे (शिवसेना उबाठा आणि अपक्ष), चेतन गजानन खुटेमाटे (अपक्ष), महेश पंढरीनाथ ठेंगणे (अपक्ष), मुनेश्वर बापूराव बदखल (अपक्ष), रमेश महादेवराव राजुरकर (भारतीय जनता पार्टी आणि अपक्ष) यांनी नामांकन दाखल केले.

महाराष्ट्रातील विधानसभेच्या एकूण २८८ जागांसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख २९ ऑक्टोबर असून, ३० ऑक्टोबरला अर्जांची छाननी होणार आहे. अर्ज माघारी घेण्याची मुदत ४ नोव्हेंबर पर्यंत आहे.

# प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल केला

**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी नगर पाथर्डी विधानसभा मतदारसंघातून 'राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- शरदचंद्र पवार' पक्षातर्फे प्राजक्त तनपुरे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. या अर्ज दाखल करण्यासाठी मतदारसंघातील शेतकरी, तरुण तसेच माता भगिनींचा जनसागर उसळला होता. जनतेचे हे अफाट प्रेम आम्हाला सर्वांसाठी अतिशय मोलाचे आहे. याबद्दल आम्ही सर्वजण मतदारसंघातील जनतेप्रती कृतज्ञ आहोत.



प्राजक्त तनपुरे यांनी आपल्या भाषणात म्हटले की, आमचे नेते आदरणीय शरदचंद्र पवार साहेबांनी पुन्हा एकदा माझ्यावर विश्वास दाखवला. तो सार्थ ठरविण्यासाठी मी सदैव काम करीत आहे. या कार्यक्रमात पक्षाचे प्रांताध्यक्ष जयंत पाटील आणि विद्यमान खासदार निलेश लंके यांनी उपस्थित राहून कार्यकर्त्यांना प्रेरणा दिली.ते पुढे म्हणाले, ही लढाई जनतेने हाती घेतली असून गुन्हेगारीला प्रोत्साहन देणाऱ्या, आपल्या माय भगिनींना अपमानकारक शब्दात हिणवणाऱ्यांना जनता योग्य ती जागा दाखवून देईल. आपल्या महाराष्ट्राची सुसंस्कृत तथा स्वाभिमानी माणसांचे राज्य ही ओळख अधिक गडद करण्याची जबाबदारी आपली आहे. या अर्ज दाखल करण्याच्या कार्यक्रमामुळे राहुरी मतदारसंघातील राजकीय वातावरण अधिक उत्साही झाले असून, जनतेच्या समर्थनामुळे प्राजक्त तनपुरे यांना मोठा आत्मविश्वास मिळाला आहे.

# गरुड झेप अकॅडमी अध्यक्ष डॉ. सुरेश सोनवणे यांनी विधानसभेसाठी अर्ज दाखल

**गंगापूर । गणेश म्हैसमाळे**


गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघासाठी जोरदार शक्तिप्रदर्शन करत, गरुड झेप अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश सोनवणे यांनी विधानसभेसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी महाराणा प्रताप चौक ते नवीन इमारत तहसील कार्यालय पर्यंत वाजत गाजत मिरवणूक करण्यात आली.

माध्यमांशी बोलताना डॉ. सोनवणे यांनी मतदारसंघातील रस्त्यांच्या बिकट अवस्थेवर चिंता व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, शिक्षण क्षेत्रातील अनेक प्रश्न उपस्थित आहेत, आणि पंधरा वर्षांत जो विकास झाला नाही, तो येत्या पाच वर्षांत करून दाखवेल. यामुळे त्यांनी उपस्थित राजकीय प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले आणि एक प्रश्नचिन्ह उपस्थित केले.या कार्यक्रमात प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये संजय आदने, सुरज मुंडे, मनोज सोनवणे, निलेश सोनवणे, गणेश सोनवणे, लक्ष्मण डोळस, प्रमोद वेळंजकर यांचा समावेश होता. यामध्ये असंख्य महिला व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग दर्शवला. डॉ. सोनवणे यांच्या उमेदवारीने स्थानिक राजकारणात नवीन उत्साह निर्माण केला असून, विकासाची वचनबद्धता मतदारांमध्ये चर्चेत आहे.

# उल्हासनगर मतदारसंघातील वंचित उमेदवार संजय गुप्ता यांच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल; उमेदवारी अर्ज भरला

**उल्हासनगर । मनोज उतेकर**

वंचित बहुजन आघाडीचे उल्हासनगर मतदारसंघातून घोषित उमेदवार संजय गुप्ता यांच्यावर नवी मुंबई एपीएमसी पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल झाला आहे. शनिवारी दाखल झालेल्या या गुन्ह्यात, गुप्ता यांनी एका महिलेवर अत्याचार केल्याचा आरोप असून, महिलेने तक्रारीत सांगितले की, ऑगस्ट महिन्यात बिझनेस सेटअप करण्याच्या आमिषाने गुप्ता यांनी तिचा विश्वासघात केला.



दरम्यान, सोमवारी संजय गुप्ता यांनी आपला उमेदवारी अर्ज भरला असून, त्यांनी सोशल मीडियावर व्हिडीओद्वारे या प्रकरणात आपल्याला फसवले जात असल्याचा दावा केला आहे. उल्हासनगर पूर्वेत राहणाऱ्या महिलेच्या तक्रारीनंतर पोलीस अधिक तपास करत आहेत.

गुप्ता हे भाजप उत्तर भारतीय सेलचे माजी अध्यक्ष होते. आमदार कुमार आयलानी यांच्यासोबत वाद निर्माण झाल्यानंतर त्यांनी भाजपला सोडचिठ्ठी देत वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केला होता. या घटनेवर वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष उज्वल महाले यांनी प्रतिक्रिया देत संजय गुप्ता यांच्यावर झालेला गुन्हा बनावट स्वरूपाचा असल्याचे म्हटले असून, पोलीस तपास सुरू आहे. पक्षाचे प्रमुख या प्रकरणावर कोणती भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वर्धा जिल्ह्यात २३ उमेदवारांचे ३५ नामनिर्देशनपत्रे दाखल

**वर्धा । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक २०२४ साठी वर्धा जिल्ह्यातील आर्वी, देवळी, हिंगणघाट आणि वर्धा या विधानसभा मतदारसंघात आज एकूण २३ उमेदवारांनी ३५ नामनिर्देशनपत्रे दाखल केली आहेत.नामनिर्देशनपत्र दाखल करणाऱ्या उमेदवारांमध्ये आर्वी मतदारसंघातून माधुरी सुरोशे, सचिन मानमोडे, दादाराव केचे, आणि कमलेश कामडी यांचा समावेश आहे. देवळी मतदारसंघातून राजेश बकाने, निलेश मसराम, किरण पारिसे, रणजित काबळे, अश्विनी शिरपुरकर, उमेश म्हैसकार, किरण ठाकरे, आणि चेतन साहू यांनी अर्ज दाखल केले. हिंगणघाट मतदारसंघात प्रलय तेलंग, मंगला ठक, विनोद उईके, आणि मुकेश धोटे, तर वर्धा मतदारसंघात रविंद्र कोंटबकर, निखील सातपुते, विलास काबळे, डॉ. पंकज भोयर, समीर देशमुख, पंकज बकाने, आणि शेखर शेंडें यांनी अर्ज दाखल केले आहेत.२९ ऑक्टोबर ही अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख असून, ३० ऑक्टोबर रोजी छाननी होणार आहे. ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेण्याची संधी आहे. २० नोव्हेंबरला मतदान होणार असून, मतमोजणी २३ नोव्हेंबरला होईल.

# दिवाळीपूर्वी ऊसाचा दुसरा हप्ता मिळण्याची मागणी



**पाथर्डी । प्रतिनिधी**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेने २८ ऑक्टोबर ला तहसील कार्यालय शेवगाव येथे सरकारकडे दिवाळीपूर्वी ऊसाचा दुसरा हप्ता मिळण्याची मागणी करणारा अर्ज सादर केला. या अर्जात शेतकऱ्यांच्या विविध मागण्या समाविष्ट आहेत, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीला सुधारणा होण्यास मदत होईल. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती आणखी गंभीर होईल. त्यांनी असा इशारा दिला आहे की, जर या मागण्यांची दखल घेतली गेली नाही, तर दिवाळीनंतर पूर्व सूचना न देता आंदोलन केले जाईल.

तहसील कार्यालयात सादर करण्यात आलेल्या या अर्जामुळे शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या संघटनांचा आवाज अजूनच मजबूत झाला आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटना अहमदनगर जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब सर्जेराव फटांगडे, अशोक भोसले, अमोल देवडे, मच्छिंद्र आर्ले, प्रशांत भराट, दत्तात्रेय फुंदे, रमेश कचरे, बाळासाहेब गर्जे आणि संतोष गायकवाड यांचा समावेश होता.शेतकऱ्यांनी या अर्जावर लवकरात लवकर दखल घेण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे, जेणेकरून दिवाळी साजरी करण्यासाठी त्यांना आवश्यक मदत मिळू शकेल.

# जंगी शक्तिप्रदर्शन करत आमदार किशोर जोरगेवार यांनी दाखल केला नामांकन अर्ज

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सोमवारी, आमदार किशोर जोरगेवार यांनी असंख्य कार्यकर्त्यांसह जंगी शक्तिप्रदर्शन करत भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून नामांकन अर्ज दाखल केला. यावेळी निघालेल्या रॅलीचे विविध ठिकाणी पुष्पवर्षाव करून स्वागत करण्यात आले.

यावेळी भाजप नेते आणि राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, भाजप चंद्रपूर विधानसभा प्रमुख प्रमोद कडू, शिवसेना जिल्हा प्रमुख बंडू हजारे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष राजीव कक्कड, अशोक जीवतोडे, चंद्रपूर जिल्हा महानगर प्रमुख भरत गुप्ता, शिवसेना महिला जिल्हा प्रमुख प्रतिमा ठाकूर, आरपीआय (आठवले गट) चे गौतम तोडे, हरीश दुर्योधन, भाजपचे जिल्हा सरचिटणीस प्रज्वलंत कडू, सूरज पेदुलवार, भाजप महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सविता कांबळे, प्रकाश देवतडे, वंदना हातगावकर, अमोल शेंडे, सलीम शेख, राशिद हुसेन, सविता दंढारे, सायली येरणे, विमल काटकर आदी प्रामुख्याने उपस्थित होते.चंद्रपूरचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांनी नुकताच भाजपमध्ये प्रवेश केला आहे. आता ते भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) आणि मित्रपक्ष महायुतीच्या वतीने चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे अधिकृत उमेदवार म्हणून घोषित झाले असून, आज सोमवारी त्यांनी भव्य मिरवणूक काढत आपला नामांकन अर्ज दाखल केला आहे.


सदर मिरवणुकीला आमदार किशोर जोरगेवार यांच्या कार्यालयातून सुरुवात झाली, ज्यामध्ये महायुतीतील हजारो कार्यकर्ते आणि जोरगेवार समर्थक सहभागी झाले. मिरवणूक शहराच्या मुख्य मार्गाने जात, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ पोहोचली. आमदार किशोर जोरगेवार यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना सांगितले की, आपण दाखविलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. मागील पाच वर्षांत आपण अनेक विकासकामे करू शकलो असून, काही कामे प्रगतीपथावर आहेत. या कामांनाही प्राधान्याने पूर्ण करायचे आहे. सुरू झालेला हा विकासपर्व अधिक गतीशील करायचा आहे, यासाठी आपली साथ आणि आशीर्वाद असाच राहावा, अशी विनंती केली. त्यांनी अंततः आपला निवडणूक नामांकन अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर केला.



## हिंदुत्ववादी मतांचे विभाजन टाळण्यासाठी उबाठा गटाच्या उमेदवाराची माघार; उद्धव सेनेला मोठा धक्का

### किशनचंद तनवाणी यांचा निवडणूक न लढविण्याचा निर्णय

**छत्रपती संभाजीनगर । प्रशांत कुंडकर**



शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या छत्रपती संभाजीनगरमध्ये शिंदे सेना आणि ठाकरे सेना यांच्यात मुख्य लढत होणार आहे. शहरातील मध्य मतदार संघात शिंदे सेनेकडून आमदार प्रदीप जैस्वाल यांना पुन्हा मैदानात उतरवले असून ठाकरे सेनेकडून किशनचंद तनवाणी यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, तनवाणी यांनी अचानक उमेदवारी मागे घेतली आहे.

तनवाणी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, २०१४ साली दोन हिंदुत्ववादी पक्षांच्या मतांमध्ये विभाजन झाल्यामुळे एमआयएमचे इम्तियाज जलील निवडून आले होते. त्याची पुनरावृत्ती होऊ नये, या उद्देशाने त्यांनी हा निर्णय घेतला आहे. त्यांनी यापूर्वी अर्ज दाखल करण्यासाठी आयोजित रॅली नागरिकांच्या असुविधेचे कारण देत रद्द केली होती. २०१४मध्ये झालेल्या निवडणुकीत जैस्वाल यांना ४१ हजार मते मिळून ते पराभूत झाले होते. परंतु, २०१९मध्ये भाजपा-शिवसेना युती झाल्याने त्यांनी ८० हजारापेक्षा अधिक मतांसह विजय मिळवला. पुढे, जैस्वाल यांनी एकनाथ शिंदेंसोबत जाण्याचा निर्णय घेतला आणि तनवाणी यांनी उद्धव ठाकरे यांच्या गटात प्रवेश केला. आता पुन्हा दोन्ही हिंदुत्ववादी उमेदवार समोरासमोर आल्याने एमआयएमच्या उमेदवार नासिर सिद्दीकी यांना फायदा होईल, या विचारातून तनवाणी यांनी माघार घेतली आहे.

**गटबाजीमुळे माघार?**

तनवाणी यांच्या निर्णयामागे पक्षांतर्गत गटबाजी असल्याची चर्चा आहे. तथापि, तनवाणी यांनी यावर भाष्य न करता पक्षाने निवडलेल्या दुसऱ्या उमेदवाराच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे

## वंचित बहुजन आघाडीच्या आमदार सिताराम घनदाट मामा यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला

**गंगाखेड । सिधोधन भालेराव**

संत जनाबाईच्या पावन भूमीत आज गंगाखेडमधील श्रद्धास्थान असलेल्या संत जनाबाईच्या दर्शनानंतर, संकट मोचन चिंतामणी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतींना पुष्पहार अर्पण करून जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी स्व. वसंतराव नाईक, छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देखील पुष्पहार अर्पण करण्यात आले.



त्यानंतर तहसील कार्यालय गंगाखेड येथे निवडणूक निर्णय अधिकारी श्री. जिवराज डापकर यांच्याकडे गंगाखेड विधानसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीच्या अधिकृत उमेदवार म्हणून आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सिताराम चिमाजी घनदाट (मामा) यांनी अर्ज दाखल केला.या प्रसंगी त्यांचे सहकारी सदाशिव आप्पा ढेले, गोपीनाथ तुडमे, जयसिंग आप्पा शिंदे पाटील, उद्धवराव सातपुते पाटील, दत्तराव भोसले पाटील, कैलाश नाना रुद्रवार, भरतदादा घनदाट, सय्यद जमीर भाई, अदनान खान, विनायक राठोड, नारायण घनवटे, संतोष जाधव पाटील, जलिंधर हत्तीअंबीरे, गौतम हत्ती अंबीरे, अजयराजे हत्तीअंबीरे, भगवान पाटील, बुचाले मामा, कोल्हे पाटील, बळीराम चवरे, तसेच वंचित बहुजन आघाडीचे आकाश पारवे, माधव ठवरे, गणेश काळे, हत्तीअंबीरे, मधुसूदन लटपटे, मुस्तफा मामा, गौतम रोहिनकर, ऍड. पवनकुमार कांबळे, प्रा. अमोल ढाकणे, शिवानंद गव्हाणे, अशोक कांबळे, शफीभाई, सय्यद जोहर, मुकिद भाई, नामदेव वाघमारे, मारोती माने सर, गोविंद भालेराव, तेलंगे मामा, ब्रह्मानंद भोसले, विठ्ठल सातपुते, आणि गणेश सातपुते यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमामुळे गंगाखेडमध्ये राजकीय वातावरण अधिक उत्साही झाले असून, सिताराम घनदाट यांच्या उमेदवारीवर चर्चा सुरू आहे.

## हदगाव–हिमायतनगर विधानसभा मतदारसंघात काँग्रेसमध्ये गटबाजी; निवडणुकीचे वातावरण तापले

**हदगाव । प्रतिनिधी**

हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघात राजकीय वातावरण अधिकच ढवळून निघाले आहे. काँग्रेसचे विद्यमान आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांनी आज उमेदवारी अर्ज भरला, ज्यासाठी कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. मात्र, काँग्रेसमध्ये गटबाजीची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. काँग्रेसचे विरोधी पक्ष नेते यांचे निकटवर्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ. रेखाताई पाटील यांनी अपक्ष उमेदवारी लढवण्याची तयारी सुरू केली आहे, ज्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे. जिल्हा परिषद सदस्य अनिल पाटील बाभळीकर यांनी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांवर टीका करत नव्या चेहऱ्याला संधी देण्याची गरज व्यक्त केली. जनता सध्याच्या नेत्यांवर नाराज आहे, त्यामुळे घराने शाही बदलायला हवी होती, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

दरम्यान, शिंदे गटाचे बाबूराव पाटील कोहळीकर यांना चौथ्यांदा विधानसभा निवडणुकीसाठी तिकीट मिळाले आहे. या निर्णयावर प्रतिक्रिया देताना भाजपाचे माजी सभापती चव्हाण साहेब उचाडंकर आणि लता ताई फाळके यांनीही अपक्ष उमेदवारी अर्ज भरणार असल्याचे जाहीर केले आहे.या मतदारसंघात जरांगे यांचा फॅक्टर प्रभावी ठरू शकतो, अशी चर्चा जनतेत आहे. या गोंधळामुळे हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघातील निवडणूक अधिकच रोचक होणार असल्याचे दिसून येत आहे.

## गोकुळ दौंड यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष गोकुळ दौंड यांनी आगामी निवडणुकांसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. पक्षांतर्गत विविध कारणांमुळे गोकुळ दौंड यांनी अपक्ष म्हणून लढण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा रंगली आहे.

गोकुळ दौंड यांच्या या निर्णयामुळे भाजपातील असंतोष वाढला असून, कार्यकर्त्यांमध्येही या बदलाबद्दलची चिंता व्यक्त करण्यात येत आहे. अनेक नेत्यांनी दौंड यांच्या निर्णयाला समर्थन दर्शवले आहे, तर काहींनी त्यांना पक्षात राहण्याचा सल्ला दिला आहे.यामुळे आगामी निवडणुकांमध्ये गोकुळ दौंड यांचे राजकीय भविष्य काय असेल, याबद्दल चर्चांना उधाण आले आहे. त्यांनी अपक्ष उमेदवारी दाखल करताना आगामी निवडणुकांमध्ये यशस्वी होण्यासाठी कसे रणनीती आखतील, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## गरुड झेप अकॅडमी अध्यक्ष डॉ.सुरेश सोनवणे यांनी विधानसभेसाठी अर्ज दाखल

**गंगापूर । गणेश म्हैसमाळे**

गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघासाठी जोरदार शक्तिप्रदर्शन करत, गरुड झेप अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश सोनवणे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी महाराणा प्रताप चौक ते नवीन इमारत तहसील कार्यालयापर्यंत वाजत गाजत मिरवणूक करण्यात आली.मीडिया प्रतिनिधींशी बोलताना डॉ. सोनवणे यांनी मतदारसंघातील रस्त्यांच्या बिकट परिस्थितीवर चिंता व्यक्त केली. शिक्षण क्षेत्रातील प्रश्न मांडले आहेत आणि पंधरा वर्षांत जो विकास झाला नाही, तो येत्या पाच वर्षांत करून दाखवेल, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यांच्या अर्ज दाखल करण्याच्या कार्यक्रमात राजकीय प्रश्न उपस्थित करून त्यांनी उपस्थितांना विचार करण्यास भाग पाडले.या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये संजय आदने, सुरज मुंडे, मनोज सोनवणे, निलेश सोनवणे, गणेश सोनवणे, लक्ष्मण डोळस, प्रमोद वेळंजकर आणि इतर पदाधिकारी सामील झाले होते. यामध्ये असंख्य महिला आणि नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग दर्शवला. डॉ. सोनवणे यांच्या उमेदवारीने स्थानिक राजकारणात एक नवीन उत्साह निर्माण झाला आहे, आणि त्यांचा विकासाचा दृष्टिकोन मतदारांमध्ये चर्चेत आहे.

## जोरदार शक्तिप्रदर्शन करत आमदार सतीश चव्हाण यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**गंगापूर । गणेश म्हैसमाळे**

गंगापूर विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार आमदार सतीश चव्हाण यांनी आज (दि. २८) जोरदार शक्तिप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.



उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ गंगापूर शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन करण्यात आला. या रॅलीत गंगापूर व खुलताबाद तालुक्यातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी, असंख्य कार्यकर्ते, सामान्य नागरिक व महिलांचा उत्स्फूर्त सहभाग होता. शिस्तबद्ध आणि शांततेत निघालेल्या या रॅलीत आमदार चव्हाण यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

रॅली दरम्यान जवळपास पाच-सहा किलोमीटर गंगापूर शहरातील मुख्य रस्त्यावर मोठी गर्दी होती. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी केलेले हे शक्तिप्रदर्शन पाहून प्रत्यक्ष दर्शकांना गंगापूर मतदारसंघात परिवर्तन अटळ आहे, अशी चर्चा स्पष्टपणे जाणवत होती. या वेळी प्रथमच इतकी मोठी गर्दी जमा झाल्याने आमदार चव्हाण यांच्यासाठी वातावरण अत्यंत आश्वासक ठरत आहे.

या गर्दीने विरोधकांसमोर मोठे आव्हान निर्माण केले असल्याचे दिसून येत आहे. राष्ट्रवादी, शिवसेना आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने रॅलीत सहभाग घेतला. रॅली पाहण्यासाठी गंगापूर शहरातील नागरिकांनी रस्त्यावर मोठी गर्दी केली होती.याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मंत्री राजेश टोपे, ज्येष्ठ नेते सुधाकर सोनवणे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जगन्नाथ खोसरे, उपजिल्हा प्रमुख लक्ष्मणभाऊ सांगळे, त्रिंबक तुपे, डॉ. नरेंद्र काळे, पांडुरंग तांगडे पाटील, संजय जाधव, राजू वरकड, दिनेश मुथा, अंकुश काळवणे, अनिल चव्हाण, संपत छाजेड, अनिल जाधव, संजय जैस्वाल, विश्वजीत चव्हाण, आयुब पटेल, जनार्धन रोडगे, महेश उबाळे, रमेश निचित, अर्चना सोमासे, मच्छिंद्र देवकर, राजू पाटील डोणगावकर, मोहसीन चाऊस, एस एस खमर, नासेर पटेल, रावसाहेब तोगे, प्रवीण नीतनवरे, नितीन कांगुने, मारोती साळवे, लक्ष्मण पाटील प्रधान, अशोक गायकवाड, राजू पठाण, अनिता बोरसे, गजानन फुलारे, विमलबाई जगताप, योगेश पाटील, सुरेश नेमाडे, आयुब पटेल, तुकाराम सटाले, सोपान देशमुख, नदीम शेख, वाजेद शेख यांच्यासह राष्ट्रवादी, शिवसेना, काँग्रेस व महाविकास आघाडीतील मित्र पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## माजी जिल्हा परिषद सदस्य पंकज ठोंबरे यांचा डॉ. दिनेश परदेशी यांना जाहीर पाठिंबा



**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूरमध्ये विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यापासून कार्यकर्त्यांची पक्षांतराची प्रक्रिया सुरू झाली आहे. याच पार्श्वभूमीवर, आज वैजापूर येथील माजी जिल्हा परिषद सदस्य पंकज ठोंबरे आणि त्यांचे सहकारी यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार डॉक्टर दिनेश परदेशी यांना जाहीर पाठिंबा दिला.

पंकज ठोंबरे यांनी आपल्या परिवार आणि वैजापूर येथील सर्व कार्यकर्त्यांना एकत्रितपणे डॉ. दिनेश परदेशी यांना समर्थन देण्याची घोषणा केली. या महत्त्वपूर्ण घोषणेत ठोंबरे परिवाराने त्यांचे संपूर्ण पाठिंबा दर्शवला आहे. या कार्यक्रमाला विनायकराव पाटील कॉलेजचे माजी अध्यक्ष भाऊसाहेब काका ठोंबरे उपस्थित होते. त्यांच्यासह अनेक स्थानिक कार्यकर्ते आणि समर्थकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. डॉ. दिनेश परदेशी यांच्या उमेदवारीला हा पाठिंबा महत्त्वाचा मानला जात आहे, कारण यामुळे त्यांच्याबरोबर कार्यरत असलेल्या समर्थकांची संख्या वाढण्याची अपेक्षा आहे

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटातर्फे रमेश थोरात यांना दौंड विधानसभेची उमेदवारी जाहीर



**दौंड । प्रतिनिधी**

२८ ऑक्टोबर २०२४ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटात अजित पवार यांचे निकटवर्तीय, पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष व दौंड तालुक्याचे माजी आमदार रमेश थोरात यांचा दौंड तालुक्यातून विधानसभेसाठी उमेदवारी जाहीर करण्यात आला आहे. रमेश थोरात यांनी कार्यकर्ते व पक्षाचे पदाधिकारी शक्ती प्रदर्शन करीत, जेसीबीवरून फुलांची उधळण करीत, छत्रपती शाहू महाराज चौक, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक, महात्मा गांधी चौक, आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी हजारो कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल करून छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये सभा घेण्यात आली. या सभेत दौंड नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष, नगरसेवक, तसेच दौंड तालुक्यातील आजी- माजी सरपंच, उपसरपंच, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व सर्व सेलचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांनी आपले मनोगत व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांनी रमेश थोरात यांच्यावर दाखवलेला विश्वास सार्थ करावा, अशी अपेक्षा व्यक्त करून कार्यकर्त्यांनी राम कृष्ण हरी, तुतारीच बरी, एकच एक्का रमेश आप्पा अशा घोषणा दिल्या. कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त मतदान करा, तूतारी वाजवणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून मतदान करावे, असे आवाहन केले.

कार्यकर्त्यांनी खोटे गुन्हे दाखल करणे, दडपशाही करणे, आणि तालुक्याचा विकास न करता पोकळ गप्पा मारणे याबाबत महाविकास आघाडीतील घटक पक्षातील नेत्यांवर बोचरी टीका केली. पाच वर्षे आमदारकी व जिल्हा बँक अध्यक्ष म्हणून केलेल्या कामामुळे दौंड तालुक्यातील विकासाची ग्वाही दिली.रमेश थोरात यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले, प्रत्येक माणसाचं काम करणे, चांगल्याला चांगलं म्हणा, वाईटला वाईट म्हणा. मी स्पष्ट बोलणारा माणूस आहे. त्यांनी दौंड तालुक्यातील नागरिकांना मतदान करून निवडून देण्याचे आवाहन केले.यावेळी महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, आणि दौंड शहर व तालुक्यातील जनता मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## पाथरीत राष्ट्रवादीकडून राजेश विटेकरच रिंगणात; पक्षश्रेष्ठींचा निर्णय जाहीर

**परभणी । लक्ष्मण उजगरे**

पाथरी विधानसभा मतदारसंघातून जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा निर्मलाबाई उत्तमराव विटेकर यांच्याऐवजी त्यांचे सुपूत्र तथा विधानपरिषद सदस्य राजेश विटेकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सोमवारी (दि. २८) महायुतीचे उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात उतरविण्याचा निर्णय घेतला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधानपरिषद सदस्य राजेश विटेकर यांना पक्षाच्या श्रेष्ठींनी कोरा एबी फॉर्म सुपूर्त केला होता. त्याद्वारे विटेकर कुटूंबियातील सदस्यांनीच उमेदवारी अर्ज दाखल करावा, असे स्पष्टपणे सुचविले होते. त्यामुळेच जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा निर्मला उत्तमराव विटेकर किंवा त्यांचे सुपूत्र आमदार राजेश विटेकर यांपैकी एकजण रिंगणात उतरणार हे स्पष्ट होते.



विटेकर कुटूंबीयांनी सुरुवातीला निर्मला विटेकर यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा विचार केला. त्यांनी पाथरी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. परंतु, या दोघांनीही उमेदवारी अर्जाबरोबर एबी फॉर्म दाखल केला नाही. या दरम्यान, राष्ट्रवादी आणि महायुतीच्या श्रेष्ठींनी मतदारसंघातील एकंदरीत व्यक्त प्रतिक्रिया व साद-पडसाद ओळखून निर्णय घेतला की, विटेकर यांच्या ऐवजी आमदार राजेश विटेकर यांच्याकडे उमेदवारी द्यावी. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सोमवारी सायंकाळी आमदार विटेकर यांच्याशी संपर्क साधून मातोश्रीं ऐवजी आपणच निवडणूक लढवावी, असे स्पष्टपणे सांगितले. पक्षश्रेष्ठींनी दिलेल्या आदेशानुसार आमदार विटेकर मंगळवारी (दि. २९) आपला अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. यामुळे पाथरी विधानसभा मतदारसंघात राजकीय वातावरण अधिक उत्साही झाले असून, आगामी निवडणुकीसाठी उत्सुकता वाढली आहे.

## एसबीआय बँकेत सणासुदीच्या काळात येतात तांत्रिक अडचणी

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील पालखेड गावात एसबीआय बँकेची शाखा असून, या शाखेत नेहमीच तांत्रिक अडचणी असल्याचे खातेदारांचे म्हणणे आहे. बँकेच्या कर्मचार्यांनी खातेदारांना या समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे सांगितले आहे.

पालखेड येथील या शाखेमध्ये १८ गावांचा समावेश आहे, ज्या गावांतील अनेक खातेदार दिवाळीच्या निमित्ताने बँकेमध्ये व्यवहार करण्यासाठी येतात. परंतु, बँकेत येताना खातेदारांना पंधरा-वीस मिनिटे काम सुरळीत चालताना दिसत असले तरी नंतर काउंटरवर तांत्रिक अडचणीमुळे कामकाज बंद आहे असे बोर्ड लावले जात आहे. हे सर्व गेल्या आठ ते दहा दिवसांपासून सुरू आहे.




या शाखेत बँकेचा व्यवस्थापक उपस्थित नसतो आणि फक्त दोनच कर्मचारी हजर असल्यामुळे खातेदारांना तासंतास प्रतीक्षा करावी लागत आहे. गोळवाडी, बेंदवाडी, दहेगाव, पालखेड, परसोडा, कनक सागज, माळी सागज, बल्लाळी सागज, एक कोडी सागज, राहेगाव, करंजगाव या गावांतील खातेदारांनी वारंवार तक्रारी केल्या असून, तरीही तांत्रिक अडचणी दूर होत नाहीत. यामुळे खातेदारांना तासंतास बँकेमध्ये बसावे लागते, ज्यामुळे त्यांचा वेळ वाया जातो आणि शेतातील कामेही होत नाहीत, अशी ग्राहकांची तक्रार आहे. मात्र, या समस्येकडे कोणाचे लक्ष देत नाही, त्यामुळे खातेदारांना रोज येरझारा बँकेमध्ये घालावा लागत आहे.

## पाथरीत २६ इच्छुकांचे २९ अर्ज दाखल

**पाथरी । लक्ष्मण उजगरे**

पाथरी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडी व महायुती या दोन्ही पक्षांच्या तुल्यबळ प्रतिस्पर्ध्यांसह अन्य पक्षांच्या इच्छुकांनी अपक्ष असे एकूण २६ इच्छुकांनी २९ उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

विद्यमान आमदार सुरेश वरपुडकर यांनी महाविकास आघाडीमार्फत सोमवारी (दि. २८) उमेदवारी अर्ज दाखल केला. तर श्रीमती निर्मलाबाई उत्तमराव गवळी विटेकर यांनी महायुतीमार्फत अर्ज दाखल केला.

याशिवाय, बी.आर.एस.पी. पक्षामार्फत सचिन निसर्गंध, राष्ट्रीय समाज पक्षातर्फे सईद खान, वंचित बहुजन आघाडी मार्फत सुरेश फड, व मराठवाडा मुक्ती मोर्चा मार्फत नारायणराव चव्हाण यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

अर्थात, रंगनाथ सोळंके, अर्जून भिसे, डॉ. राम शिंदे, गोविंद घाडगे, अरुण कोल्हे, माधवराव फड, गयाबाई माधवराव फड, बाबुराव रावसाहेब कोल्हे, नितीन लोहट, रामराव दादासाहेब टेंगसे, व डॉ. जगदीश शिंदे यांनीही विविध पक्षांमार्फत उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. सोमवार पर्यंत एकूण २६ इच्छुकांचे २९ अर्ज दाखल झाले आहेत, ज्यामुळे पाथरी विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवण्यासाठी इच्छुकांची संख्या वाढली आहे.

## कुरहा काकोडाकडून खामगावकडे जाणारी तुरदाळ भरलेली गाडी पलटी

**खामगाव । प्रतिनिधी**

कुरहा काकोडाकडून खामगाव एमआयडिसी कडे जाणारी तुरदाळ भरलेली गाडी क्रमांक एम एच २८ बीबी -८००२ अचानक पलटी झाली. या अपघातात गाडीत दोन व्यक्ती होत्या, परंतु सौम्य अपघातामुळे त्यांना कोणत्याही प्रकारची हानी झाली नाही.

गाडी पलटल्यामुळे घटनास्थळी गडबड उडाली, पण वेळेत स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. गाडीवर कोणतीही गंभीर समस्या न आल्यामुळे या घटनेत मोठा अपघात टळला. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन परिस्थितीचा आढावा घेतला आणि गाडी पुनःस्थापित करण्याची प्रक्रिया सुरू केली.




या अपघातामुळे काही काळ वाहतूक खोळंबली होती, पण संबंधित अधिकाऱ्यांच्या कामगिरीमुळे लवकरच वाहतूक पुन्हा सुरळीत झाली. घटनास्थळावर उपस्थित असलेल्या लोकांनी चालकाची वाचवलेल्यांची प्रशंसा केली, कारण त्यांनी वेळेत सावधगिरी बाळगली.

## सांगोला विद्यामंदिर इंग्लीश मीडियम स्कूलच्या विद्यर्थ्यांनी दिली सांगोला पोस्ट ऑफीसला भेट

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला विद्यामंदिर इंग्लिश स्कूल मधील विद्यर्थ्यांनी शहरातील जय भवानी चौकातील मुख्य पोस्ट ऑफीसला शैक्षणिक भेट दिली..या भेटीत त्यानी पोस्ट ऑफीसचे काम कशा पद्धतीने चालते,याची माहिती करुन घेतली..पोस्टातील कर्मचारी गंगाधर देशपांडे यानी विद्यार्थाना विविध विभागाची माहिती दिली...पोस्टात बचत खाते सुरु करणे, आर.डी.खाते,मुदत ठेव,सुकन्या योजना,ज्येष्ठ नागरिकासाठी अधिक व्याज देणारी योजना,दरमहा पेन्शन देणारी एम.आय.एस.योजना...दामदुप्पट ठेव, टपाल तिकिटे,पार्सल,जलद टपाल सेवा,मनी ऑर्डर आदि विविध सेवाकार्यावर देशपांडे यानी मार्गदर्शन केले...त्याच बरोबर पोस्टमन व त्यांचे कार्य याबाबत विशेष माहिती देण्यात आली...या वेळी मुख्य पोस्ट मास्तर अनिरुद्ध देशपांडे, पोस्ट कर्मचारी हणमंत निंबाळकर,,तृप्ती अजगर,घाडगे,पवार ,,होवाल,शेख,शिक्षिका,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. रघुनाथ बोरकर यांचा 'भारतीय पुरालेखागार' ग्रंथ बी.ए. प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट




**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीच्या नव्या अभ्यासक्रमानुसार बी.ए. प्रथम वर्षाच्या इतिहास सेमिस्टर पेपर क्रमांक तीनसाठी भारतीय पुरालेखागार या विषयावर आधारित नवीन अभ्यासक्रमात डॉ. रघुनाथ बोरकर यांनी लिहलेला भारतीय पुरालेखागार हा ग्रंथ विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करण्यात आला आहे. हा ग्रंथ डॉ. रघुनाथ बोरकर यांचा चौदावा ग्रंथ असून, या ग्रंथ मालिकेतील तिसरा क्रमिक अभ्यासक्रमानुसार आहे. या ग्रंथाद्वारे नव्याने समाविष्ट केलेल्या पुराभिलेख इतिहास विषयाची माहिती बी.ए. करणाऱ्या विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना आणि इतिहास प्रेमींना पुरालेखागाराची ओळख करुन देईल. या ग्रंथाचा विद्यार्थ्यांना परीक्षेचा अभ्यास करताना महत्वाचा उपयोग होणार आहे. ग्रंथ निर्मितीचे मुख्य उद्दिष्ट केवळ अभ्यासक्रम समजून देणे नसून, विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी तयार करणे हे आहे. सदर ग्रंथ नागपूर येथील प्रसिद्ध प्रकाशक मनोहर पिंपळापुरे यांच्या पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्सने प्रकाशित केला आहे.

अभ्यासकांनी या ग्रंथाचा लाभ घेण्याचे आवाहन डॉ. रघुनाथ बोरकर यांनी केले आहे.

## किनकर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत एरोस्पेस डिझाइनवर विशेष सेमिनार

**सेलू । प्रतिनिधी**

किनकर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सेलू येथे एरोस्पेस डिझाइन क्षेत्रातील संधी आणि आव्हानांवर एक विशेष सेमिनार आयोजित करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून टाटा अडव्हान्स सिस्टीम, मिहान, नागपूरचे इंजिनिअर धिरज गजानन देवतारे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना एरोस्पेस तंत्रज्ञानातील अद्ययावत माहिती दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव किशोर किनकर होते, तर प्राचार्य डॉ. प्रशांत रेवतकर आणि यांत्रिक विभागप्रमुख संकेत चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. सेमिनारची सुरुवात डॉ. प्रशांत रेवतकर यांच्या प्रास्ताविकाने झाली, ज्यामध्ये त्यांनी यंत्र अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना एरोस्पेस डिझाइनमधील संधींबद्दल माहिती दिली आणि त्यासाठी तयार राहण्याचे आवाहन केले. इंजिनिअर धिरज देवतारे यांनी एरोस्पेस क्षेत्रातील अत्याधुनिक डिझाइन, उत्पादन प्रक्रिया, आणि आव्हानांविषयी सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना करिअर घडविण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि तंत्रज्ञानाच्या गरजा यावर भर दिला.संस्थेचे सचिव किशोर किनकर यांनी उद्योगातील अद्ययावत तंत्रज्ञान आणि कौशल्ये विद्यार्थ्यांना प्रदान करण्याची संस्थेची वचनबद्धता व्यक्त केली. या सेमिनारला यांत्रिक विभागातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मयूर उमाटे यांनी केले.



## वर्ध्यात महाविकास आघाडीत घराणेशाहीला प्राधान्य; शेंडे, कांबळे आणि काळे कुटुंबांचा प्रभाव

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघात घराणेशाहीचे राजकारण ४० वर्षांहून अधिक काळ सुरू आहे. काँग्रेस पक्षातील तीन कुटुंबे या राजकारणाचे केंद्र बनली आहेत, ज्यामुळे महाविकास आघाडीत घराणेशाहीला महत्त्वाचे स्थान मिळाले आहे.



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रमोद शेंडे आणि त्यांच्या कुटुंबाने १९६० पासून वर्ध्यातील राजकारणावर वर्चस्व ठेवले आहे. प्रमोद शेंडे १९७८ मध्ये विधानसभेत पहिले पाऊल टाकले आणि अनेक निवडणुकांमध्ये विजय मिळवला. त्यानंतर शेखर शेंडे यांना २००९, २०१४ आणि २०१९ मध्ये काँग्रेसने उमेदवारी दिली, आणि आता २०२४ च्या निवडणुकीसाठी शेखर पुन्हा तिकीट मिळालं आहे.

देवळी विधानसभा मतदारसंघात काँग्रेस नेत्या प्रभा राव यांचा परिवार १९७२ पासून राजकीय प्रभाव ठेवत आहे. प्रभा राव यांनी अनेकवेळा निवडणूक जिंकली असून, त्यांचा भाचा रणजित कांबळे १९९९ पासून २०१९ पर्यंत या मतदारसंघातून आमदार होते. यावेळी रणजित कांबळे यांनाही काँग्रेसने उमेदवारी दिली आहे.

आर्वीत, डॉ. शरद काळे यांच्या कुटुंबाने १९८५ पासून राजकीय प्रभाव राखला आहे. त्यांचे निधन झाल्यानंतर पुत्र अमर काळे यांना राजकीय वारसा मिळाला. अमर काळे यांनी २००४ मध्ये पोटनिवडणूक जिंकली, मात्र २०१९ मध्ये त्यांना मतदारांनी नकार दिला. त्यानंतर मयूरा काळे यांना शरद पवार गटाकडून तिकीट देण्यात आले आहे.या सर्व कुटुंबांच्या प्रभावामुळे वर्ध्यातील राजकारणातील घराणेशाहीचे स्वरूप पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे, आणि महाविकास आघाडीत या कुटुंबांचे स्थान आणखी मजबूत झाले आहे.

# तीस लाखाच्या रकमेसाठी मरण पावला विश्वास

# गळफास देत दोघांनी संपवला स्नेहलताचा श्वास



जिल्हा पोलिस अधिक्षक डॉ.महेश्वर रेड्डी




मयत स्नेहलता चुबळे



स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बबन आव्हाड







**जळगाव (प्रशांत कुंडकर)**

स्नेहलता अनंत चुबळे या सेवानिवृत्त जिल्हा परिषद कर्मचारी होत्या. साळवा ता. धरणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात परिचारिकेची सेवा बजावल्यानंतर सन २०२३ मधे त्या रुग्ण सेवेतून निवृत्त झाल्या होत्या.

जळगाव शहरातील खोटे नगर परिसरात त्यांचे स्वत:चे घर होते. त्यांचा विवाहीत मुलगा समीर हा नाशिक येथे खासगी नोकरी करत होता. पुत्र प्रेमापोटी त्या आपल्या पतीसह सेवानिवृत्तीनंतर नाशिक येथेच राहू लागल्या. अधून मधून त्या जळगावला कामानिमीत्त ये जा करत होत्या. जळगाव येथील राहत्या घराची एक खोली वगळता इतर भाग त्यांनी भाड्याने दिला होता. जळगावला कामानिमीत्त आल्यानंतर मुक्कामासाठी ती खोली राखीव ठेवण्यात आली होती.

सेवानिवृत्तीनंतर स्नेहलता यांचे सुखाचे दिवस सुरु होते. त्यांचा सर्वाधिक वेळ नाशिक येथे मुलगा, सुन आणि पतीसोबत व्यतीत होत असे. त्या जळगाव येथील सरकारी नोकरांच्या सहकारी पतपेढीच्या सभासद होत्या. या पतपेढीची १८ ऑगस्ट २०२४ रोजी नुतन मराठा महाविद्यालयात बैठक होती. त्या बैठकीसाठी स्नेहलता चुबळे या १७ ऑगस्ट रोजी नाशिक येथून जळगावला येण्यासाठी निघाल्या होत्या. १८ ऑगस्ट रोजी त्यांनी ग. स. सोसायटी अर्थात सरकारी नोकरांच्या सहकारी पतपेढीच्या बैठकीला हजेरी लावली. सेवानिवृत्तीनंतर त्यांना मिळालेल्या तीस लाख रुपयांची त्यांनी रिंगरोडवरील स्टेट बँकेच्या कृषी विकास शाखेत एफडी ठेवली होती. ती रक्कम त्यांना काढायची होती. मोठी रक्कम काढायची असल्यास बँकेला आगावू सुचना द्यावी लागते. त्यामुळे त्यांनी १९ ऑगस्ट रोजी बँकेत जावून आपणास तीस लाख रुपयांची रक्कम विड्रॉल करायची असल्याबाबत सुचना दिली. स्नेहलता चुबळे यांना नाशिक येथे एक फ्लॅट घ्यायचा होता. त्यासाठी त्यांना तीस लाख रुपयांची रक्कम नाशिक येथे घेऊन जायची होती.

स्न्हेलता चुबळे या परिचारिका म्हणून साळवा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असतांना त्याठिकाणी जिजाबराव अभिमन्यु पाटील नावाचा लिपीक काम करत होता. जिजाबराव पाटील हा लिपिक संघटनेचा जिल्हाध्यक्ष देखील होता. एकाच ठिकाणी दोघांची सेवा झालेली होती. त्यामुळे साहजीकच दोघांची ओळख होती. सेवानिवृत्तीच्या वेळी व नंतर देखील जिजाबराव पाटील याने स्नेहलता यांना वेळोवेळी कार्यालयीन मदत केली होती. त्यामुळे त्यांचा जिजाबराव पाटील याच्यावर विश्वास होता. स्नेहलता चुबळे यांना नाशिक येथे फ्लॅट घ्यायचा आहे आणि त्यासाठी जळगावला आल्यानंतर त्या बँकेत तीस लाख रुपयांची रक्कम घेण्यासाठी जाणार असल्याचे जिजाबराव यास माहित होते. रक्कम मोठी असल्यामुळे बँकेत मदतीसाठी स्नेहलता चुबळे यांनी जिजाबराव यास मदतीसाठी बोलावले होते.

तीस लाख रुपयांची भलीमोठी रक्कम घेऊन स्नेहलता चुबळे या नाशिकला जाणार असल्याची माहिती समजल्यानंतर जिजाबरावच्या मनात कुविचाराने थैमान घालण्यास सुरुवात केली. लाखो रुपये लबाडीने आपल्याला मिळाले तर आपले भले होईल असा कुविचार त्याच्या डोक्यात घोळू लागला. आजवर स्नेहलता चुबळे यांनी जिजाबराव पाटील याच्यावर खुप विश्वास टाकला होता. या विश्वासातूनच त्यांनी जिजाबराव यास केवळ विड्रॉलच्या वेळी बँकेत मदतीसाठी बोलावले होते. मात्र त्याने लागलीच एक प्लॅन आखला. या प्लॅनमधे त्याने त्याचा साथीदार विजय रंगराव निकम यास सहभागी करुन घेतले. विजय रंगराव निकम हा देखील जिल्हा परिषद कर्मचारी होता. तो अमळनेर येथील बांधकाम विभागात लिपिक म्हणून काम करत होता. तो लिपिक संघटनेचा उपाध्यक्ष होता. अशा प्रकारे लिपिक संघटनेचा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष असे दोघे जण एकत्र आले. दोघेही अमळनेर येथील रहिवासी होते.

२० ऑगस्टचा दिवस उजाडला. ठरल्यानुसार या दिवशी स्नेहलता चुबळे या बँकेत आल्या. जिजाबराव हा देखील त्याची चारचाकी क्रेटा गाडी घेऊन बँकेत प्रकट झाला. त्याने त्याचा साथीदार विजय निकम याला सोबत आणले होते. मात्र तो बँकेत न येता गाडीतच बसून राहीला. ठरल्यानुसार तीस लाख रुपयांची रक्कम विड्रॉल झाली. यावेळी जिजाबरावने स्नेहलता यांना मदत केली. त्यानंतर त्यांनी जिजाबराव यास मी रिक्षाने घरी जाते व नंतर तेथून नाशिकला जाते असे म्हटले. मला फक्त रिक्षा ठरवून द्या असे तिने जिजाबरावला म्हटले. मात्र कुविचार डोक्यात ठेवून असलेल्या जिजाबरावने त्यांना म्हटले की मला मिटींगसाठी उद्या नाशिकला जायचे आहे. मी तुम्हाला सोडून देतो. तुम्ही माझ्या कारमधे बसा. जिजाबरावने सारखी सारखी गळ घातल्यामुळे इच्छा नसतांना मात्र तरीदेखील केवळ विश्वासावर त्या त्याच्या कारमधे बसल्या. कारमधे अगोदरच पुढच्या सिटवर विजय रंगराव निकम बसलेला होता. तो स्नेहलता चुबळे यांच्यासाठी अनोळखी होता.

वाटेत खोटे नगर नजीक स्नेहलता यांनी त्यांच्या घरापासून काही अंतरावर जिजाबराव यास गाडी उभी करण्यास सांगितले. तीस लाख रुपयांची पिशवी सोबत घेऊन त्या पायी पायी घरी गेल्या. घरी गेल्यानंतर त्यांनी घरगुती सामानाची अजून एक पिशवी सोबत घेतली. त्यानंतर लागलीच त्या पुन्हा गाडीत येऊन बसल्या. त्यानंतर एरंडोल, पारोळा मार्गे तिघे जण नाशिकला जाण्यास निघाले. वाटेत पारोळा गेल्यानंतर स्नेहलता यांनी पती संजय यांना सव्वा सात वाजेच्या सुमारास फोन केला. तो त्यांचा पतीसोबत अखेरचा कॉल ठरला. माझे जळगावचे काम झाले असून मी रात्री अकरा वाजेपर्यंत नाशिकला येत आहे. तुम्ही मला घेण्यासाठी स्टेशनवर या असे स्नेहलता यांनी त्यांच्या पतीसोबत अखेरचे बोलणे केले. त्यानंतर पुढे जिजाबराव पाटील आणि विजय निकम यांच्याकडून आपली हत्या होणार असल्याची पुसटशी देखील कल्पना स्नेहलता चुबळे यांना आली नाही. पतीसोबत त्यांचा तो अखेरचा कॉल होता.

एरंडोल, पारोळा ही दोन्ही गावे गेल्यानंतर पुढे धुळे मार्गे न जाता पारोळ्यानंतर विचखेडा गावापासून नाशिकला जाणा-या रस्त्याचा जिजाबरावने वापर केला. दरम्यान मागच्या सिटवर बसलेल्या स्नेहलता यांना डुलकी रात्रीचा अंधार आणि गार वारा लागत असल्यामुळे झोप लागण्यास सुरुवात झाली. स्नेहलता चुबळे यांना झोप लागली होती. या संधीचा फायदा घेत आर्वी गावानजीक दोघांनी स्नेहलता यांचा मोबाईल बंद करुन टाकला. पुढे काही अंतर गेल्यानंतर जिजाबरावने गाडी उभी केली. याठिकाणी दोघांनी मिळून स्नेहलता यांचा त्यांच्याच स्कार्फने गळा आवळण्यास सुरुवात केली. झोपेतच त्यांची गळा दाबून हत्या करण्यात आली. ती त्यांची काळरात्र ठरली. गाडीतील दोघांनी सोबत गोणपाट आणि सुतळी अशा वस्तू आवर्जून हेतूपुर्वक आणल्या होत्या. निर्जन ठिकाणी गाडी उभी करुन दोघांनी मिळून स्नेहलताचा मृतदेह गोणपाटात टाकला. गोणपाट सुतळीने बांधून बंद केले. आजवर स्नेहलताने जिजाबराव याच्यावर टाकलेला विश्वास केव्हाच संपला होता. निव्वळ तिस लाखांच्या रकमेसाठी जिजाबरावने त्याचा साथीदार विजयच्या मदतीने स्नेहलताची हत्या केली. स्नेहलताच्या विश्वासाची जिजाबरावने काहीच किंमत केली नाही. त्यानंतर आर्वी गावापासून मालेगाव, शिरुड चौफुलीअशा रस्त्याने टोलनाका वाचवत दोघांनी मयत स्नेहलताच्या मृतदेहाचे गोणपाट सोबत घेत धुळे शहराच्या दिशेने मार्गक्रमण सुरु केले. आपण टोल नाक्याच्या सिसीटीव्ही फुटेजमधे दिसू नये यासाठी त्यांनी टोल नाका वाचवत वाचवत मार्गक्रमण करत चाळीसगाव चौफुलीमार्गे धुळे गाठले. त्यानंतर फागणे - अमळनेर मार्गे शिरपूर महामार्गावरील तापी नदीचा पुल गाठला. त्यावेळी रात्रीचे सुमारे साडेदहा ते अकरा वाजेची वेळ होती. सततधार सुरु असलेला पाऊस थांबण्याचे नाव घेत नव्हता. तापी नदीच्या पात्रापासून सुमारे अडीचशे फुट उंचीच्या पुलावरुन भर पावसात दोघांनी स्नेहलताच्या मृतदेहाचे सुतळीने बांधलेले पोते दोघांनी मिळून नदीच्या पाण्याच्या ओसंडून वाहणा-या प्रवाहात फेकून दिले. दोघांजवळ जराही दयामाया उरली नव्हती. केवळ तिस लाखांसाठी ते मानवी रुपातील राक्षस बनले होते. तिस लाखांची बॅग वगळता स्नेहलता चुबळे यांच्याजवळ असलेली पर्स, मोबाईल आणि घरगुती सामानाची पिशवी असे साहित्य देखील दोघांनी नदीच्या प्रवाहात फेकून दिले. तेथून यु टर्न घेत दोघांनी नरडाणा मार्गे अमळनेरच्या दिशेने गाडी हाकली. दोघेही अमळनेरचे रहिवासी होते. अमळनेर गावाच्या बाहेर गाडी उभी करुन दोघांनी प्रत्येकी पंधरा पंधरा लाखाची रक्कम वाटून घेतली. त्यानंतर जणू काही झालेच नाही अशा अविर्भावात दोघांनी आपआपल्या घरी प्रवेश केला. दरम्यान रात्र उलटली तरी स्नेहलता चुबळे नाशिकला पोहोचल्या नाही, त्यांचा फोनदेखील बंद येत होता म्हणून त्यांचे पती व मुलगा असे दोघेजण हैराण झाले. दुस-या दिवशी २१ ऑगस्ट २०२४ रोजी स्नेहलता यांचे पती व मुलगा समीर या दोघांनी जवळपासचे मित्र व नातेवाईक यांच्याकडे फोन करुन त्यांची विचारपुस केली. मात्र कुणाकडेही स्नेहलता आलेल्या नव्हत्या. त्यामुळे दोघा पिता पुत्रांच्या बेचैनीत अजूनच भर पडली.

दरम्यान स्नेहलता यांची मुलगी मयुरी हिला तिच्या धरणगाव तालुक्यातील चांदसर येथील मामांकडून समजले की तिच्या आईला नाशिक येथे फ्लॅट घ्यायचा होता. तो फ्लॅट घेण्यासाठी स्नेहलता यांनी जळगाव येथील रिंगरोड परिसरातील स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या कृषी विकास शाखेतून तिस लाख रुपयांची रक्कम २० ऑगस्ट रोजी काढली होती. ती रक्कम काढतांना मदतीसाठी त्यांच्यासोबत जिजाबराव पाटील हा हजर होता. त्यानंतर २२ ऑगस्ट रोजी पुन्हा दोघा पिता पुत्रांनी मिळून स्नेहलता यांचा शोध घेतला. परंतू त्यांचा कुठेही शोध लागला नाही. त्यामुळे दोघा पिता पुत्रांनी सोबतच जळगाव तालुका पोलिस स्टेशन गाठत आपली कैफीयत मांडली. सुरुवातीला या घटनेप्रकरणी मिसींग दाखल करण्यात आली. ६१/२०२४ या क्रमांकाने २३ ऑगस्ट २०२४ रोजी दाखल करण्यात आलेल्या या मिसींगचा पुढील तपास हे.कॉ. अनिल मोरे यांच्याकडे देण्यात आला. जळगाव तालुका पोलिस आपल्या पातळीवर या मिसींगचा तपास करत होते. स्नेहलता यांचे पती व मुलगा असे दोघेजण देखील त्यांच्या पातळीवर याबाबत सर्वत्र चौकशी करत होते.

बेपत्ता स्नेहलता चुबळे यांचा मुलगा समीर, पती संजय, मुलगी मयुरी आदींनी थेट जिजाबराव पाटील याची भेट घेत त्याला तुम्ही स्नेहलता सोबत बॅंकेत गेले होते का अशी विचारणा केली. त्यावर जिजाबराव याने त्यांना सांगितले की मी २० ऑगस्ट रोजी स्नेहलता यांच्यासोबत बँकेत गेलो होतो. त्यांना तिस लाख रुपयांची रक्कम काढण्याकामी मदत केली. त्यानंतर मी त्यांना रोख रकमेच्या बॅगसह रिक्षात बसवून दिले. त्यानंतर पुढचा घटनाक्रम आपल्याला माहिती नाही असे त्याने सर्वांना सांगितले. त्यानंतर सर्वजण खोटे नगर येथील त्यांच्या घराचे भाडेकरी किरण गोसावी यांच्या आईची भेट घेण्यासाठी गेले. किरण गोसावी यांच्या आईने समीर यास सांगितले की तुझी आई २० ऑगस्टच्या सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास घरी आली होती. मात्र मला लागलीच जायचे आहे असे सांगून लगेच निघून गेली होती.

त्यानंतर पुन्हा सर्वांनी जळगाव तालुका पोलिस स्टेशन गाठत मिसींगचा तपास करणा-या हे.कॉ. अनिल मोरे यांची भेट घेतली. हे.कॉ. अनिल मोरे यांनी संबंधीत स्टेट बँकेच्या शाखेत जावून २० ऑगस्ट या तारखेचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यात त्यांना कॅश काऊंटरवरुन पैसे घेतांना स्नेहलता आणि त्यांच्यासोबत जिजाबराव पाटील असे दोघे जण दिसून आले. स्नेहलता यांच्या मोबाईलचे लोकेशन पारोळा दिसून आल्याने त्याठिकाणी देखील तपास करण्यात आला. मात्र त्यात काही निष्पन्न झाले नाही.

बघता बघता मिसींग दाखल होऊन दहा दिवसांचा कालावधी उलटला. मात्र मिसींगचा तपास पुढे सरकत नव्हता. अखेर स्नेहलता चुबळे यांच्या पती व मुलाने सोबत पोलिस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांची भेट घेत आपली व्यथा आणि घातपाताची शंका कथन केली. विषय गंभीर असल्याचे डॉ. रेड्डी यांच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही. त्यांनी अजिबात वेळ न दवडता समांतर तपासाची सुत्रे स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. बबन आव्हाड यांच्याकडे सोपवली. पो.नि. बबन आव्हाड यांनी तातडीने गुणवत्ताधारक माहितगार कर्मचा-यांचे एक पथक तयार केले. या पथकात सहायक फौजदार विजयसिंग पाटील, हे.कॉ. सुधाकर अंभोरे, हे.कॉ. जितेंद्र पाटील, अकरम शेख, महेश महाजन, लक्ष्मण पाटील, पोलिस नाईक राहुल पाटील, भारत पाटील आदींचा समावेश करण्यात आला. या पथकाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कसून तपास सुरु केला.

संशयाची सुई असलेल्या जिजाबराव पाटील यास चौकशीकामी बोलावून त्याची सखोल चौकशी केली. त्यावेळी जिजाबराव याने मी बँकेत स्नेहलता यांच्या सोबत पैसे काढतांना सोबत होतो आणि त्यानंतर त्यांना घरी खोटे नगरपर्यंत सोडल्याचे सांगितले. यापुर्वी स्नेहलता यांच्या मुलाला त्याने म्हटले होते की मी त्यांना रिक्षात बसवून दिले होते. अशा प्रकारे वेगवेगळे वक्तव्य त्याने केले. त्याचे बोलणे संशयास्पद आणि बोलण्यात तफावत आढळून आल्याने त्याच्या मोबाईलचे कॉल डीटेल्स काढण्यात आले.

त्याच्या मोबाईल कॉल डीटेल्समधे त्याचे विजय निकम याच्यासोबत सर्वाधिक बोलणे झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्याला स्वतंत्रपणे चौकशीकामी बोलावण्यात आले. त्याने वेगळीच स्क्रिप्ट पोलिस पथकला कथन केली. दोघांच्या बोलण्यात तफावत असल्याचे पोलिस पथकाच्या लक्षात आले. संशयाची सुई जिजाबराव अभिमन्यु पाटील आणि विजय रंगराव निकम यांच्याकडे फिरु लागली. तीस लाख रुपयांच्या लालसेपोटी स्नेहलता चुबळे यांचा घातपात केला असल्याच्या संशयाखाली दोघांविरुद्ध जळगाव तालुका पोलिस स्टेशनला हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. स्नेहलता चुबळे यांचा मुलगा समीर संजय देशमुख याने दिलेल्या फिर्यादीनुसार गु.र.नं. ३१२/२०२४ प्रमाणे भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १०३(१), ६१(२),२३८, ३(५) प्रमाणे हा गुन्हा दाखल करण्यात आला. जिजाबराव अभिमन्यु पाटील व विजय रंगराव निकम या दोघांनी स्नेहलता संजय चुंबळे यांच्या जवळ असलेल्या तिस लाख रुपयांच्या रकमेच्या लालसेपोटी घातपात करुन त्यांना जिवे ठार करुन त्यांच्या मृतदेहाची कुठेतरी विल्हेवाट लावल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला.

स्थानिक गुन्हे शाखेने दोघा संशयीत आरोपींना अटक केली. दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने दोघांना ११ सप्टेबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावली. पोलिस कोठडी दरम्यान दोघांनी आपला गुन्हा कबुल केला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोघांची सखोल चौकशी, सीसीटीव्ही फुटेजची तपासणी, संशयीतांचे कॉल डिटेल्स आदी बाबी व्यवस्थित हाताळल्या. मासेमारी करणा-या पथकाच्या माध्यमातून स्नेहलता चुबळे यांच्या मृतदेहाच्या पोत्याचा आणि त्यांच्या वस्तूंचा घटनास्थळावरील नदी पात्रात शोध लावला जात आहे. मासेमारी करणा-या पट्टीच्या पोहणा-यांच्या मदतीने स्नेहलता यांचा मृतदेह हुडकून काढण्याचे कसोशीने प्रयत्न सुरु असून मृतदेह शोधून देणा-यांना योग्य ते बक्षीस दिले जाईल असे त्यांना सांगण्यात आले आहे.

पोलिस कोठडीदरम्यान दोघा संशयीतांनी गुन्ह्यात वापरलेली कार आणि दोघांनी अर्धे अर्धे वाटून घेतलेले एकुण तिस लाख रुपये हस्तगत करण्यात आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेने या गुन्ह्याचा शोध लावला.

पुढील तपास जळगाव तालुका पोलिस स्टेशनचे पो.नि. महेश शर्मा व त्यांचे सहकारी पोलिस उपनिरीक्षक नयन पाटील, गणेश साईकर, पोलिस हेडकॉन्स्टेबल प्रवीण पाटील, केतन पाटील आदी करत आहेत.

मोह हे दुखा:चे कारण असते. मोहात पडलेल्या मनुष्याच्या नशीबी कोणत्या ना कोणत्या रुपाने दुख: येते. एखाद्यावर अती विश्वास टाकणे हा घटक देखील दुखा:स कारणीभूत ठरतो. त्यासाठी मोह आणि परक्यावर अती विश्वास टाकणे या दोन गोष्टी मनुष्याने लक्षपुर्वक करायला हव्या असे या घटनेच्या निमीत्ताने सांगावेसे वाटते. जिजाबराव पाटील आणि विजय निकम या दोघांना तीस लाख रुपयांचा मोह झाला. आणि या मोहातूनच त्यांच्या हातून गुन्हा घडला. मयत बेपत्ता स्नेहलता चुबळे यांनी जिजाबराव पाटील याच्यावर अती विश्वास टाकला आणि हिच चुक त्यांना भोवली आणि प्राणास मुकावे लागले. जीवनभर परिचारिकेची सेवा करुन त्यांनी तीस लाख रुपये जमा केले. जिजाबराव पाटील याने त्यांना २८ लाख रुपयात नाशिकला फ्लॅट मिळवून देतो असे सांगितले असल्याचे देखील म्हटले जात आहे.

त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून त्यांनी बँकेतून रक्कम काढल्याचे म्हटले जात आहे. एवढी मोठी रक्कम स्नेहलता बँकेतून काढणार असल्याची माहिती त्यांच्या पती व मुलाला माहिती नव्हती. ती माहिती परक्या जिजाबराव पाटील यास माहिती होती. अखेर त्या तीस लाख रुपयांची रक्कम बघून जिजाबरावची नियत फिरली. त्यामुळे त्याने विजय निकम याला देखील या कटात सहभागी करुन घेतले. पर्यायाने तो देखील मोहात पडला आणि गुन्ह्यात अडकला. मोहात पडणारा आणि परक्यावर अती विश्वास ठेवणारा असे दोघेही दुखा:ला आमंत्रण देत असतात.

# दोन एसटी बसची समोरा-समोर धडक ;एक ठार, ६९ प्रवासी जखमी

**वरवंड । प्रतिनिधी**

पुणे-सोलापुर राष्ट्रीय महामार्गावर वरवंड (ता. दौंड) येथे दोन एसटी बसच्या समोरा-समोर धडकेत भीषण अपघात झाला. या अपघातात एक महिला मयत झाली, तर गंभीर आणि किरकोळ जखमांसहित तब्बल ६९ प्रवासी जखमी झाले. सोमवारी सव्वा एक वाजता हा अपघात झाला.मयत झालेल्या महिलेचे नाव सुवर्णा होले (रा. पाटस, ता. दौंड, जि. पुणे) आहे. या अपघातात दोन्ही एसटी बसमध्ये रक्ताचा पडलेला सडा, अडकलेले प्रवासी आणि रडण्याचा आवाज या भयावह दृष्याने नागरिकांचे काळीज पिळवटून गेले. घटनास्थळी तत्काळ उपस्थित झालेल्या १० ते १२ रुग्णवाहिकांनी जखमींना उपचारासाठी तालुक्यातील काही दवाखान्यात दाखल केले.सध्या दिवाळीच्या सुट्या असल्यामुळे महामार्गावर वाहनांची वर्दळ वाढलेली आहे. सोमवारीच्या या अपघाताने परिसरात खळबळ माजवली आहे. महामार्गावर जामखेड-पुणे एसटी (एमएच ११ बीएल ९४११) जामखेडहून पुण्याकडे जात होती, तर पुणे-तुळजापुर एसटी (एमएच १४ बीटी ३३७९) तुळजापुरकडे चालली होती. दुपारी सव्वा एक वाजता वरवंड येथील कौठीचा मळा भागात पुण्याच्या दिशेने जाणारी जामखेड एसटी अचानक दुभाजकामधून पलीकडच्या मार्गावर गेली, त्याचवेळी समोरुन तुळजापुर एसटी येत होती. या दोन्ही बसच्या समोरा-समोर धडक झाल्याने भीषण अपघात झाला. जामखेड एसटी अपघातानंतर महामार्ग सोडून काही अंतर उत्तर दिशेला जाऊन थांबली. या अपघातात एकूण १०५ प्रवासी होते.अपघाताचा प्रचंड आवाज होताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत करण्यास सुरुवात केली. एसटीमध्ये अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले, तर काही अडकले होते. दोन्ही एसटीचे चालकही गंभीर जखमी झाले. नागरिकांनी मोठ्या शिताफिने प्रवासी बाहेर काढले.माहिती मिळताच पाटस पोलिस, महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिक आणि पोलिसांनी पाटस टोल प्लाझा व खासगी दवाखान्यातून १२ ते १३ रुग्णवाहिकांनी जखमी प्रवाशांना उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, अक्षय नर्सिंग होम, हर्ष हॉस्पिटल, पाटील हॉस्पिटल व इतर दवाखान्यात दाखल केले. एकूण ६९ प्रवासी जखमी झाले, यावेळी उपचारादरम्यान एका महिलेचा मृत्यू झाला. मयताचा आणखी आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अप्पर पोलिस अधिक्षक गणेश बिराजदार, उपविभागीय पोलिस अधिकारी बापुराव दडस, पोलिस निरीक्षक नारायण देशमुख यांनी घटनास्थळी भेट देऊन अपघाताची माहिती घेतली. दरम्यान, अपघात नेमका कशामुळे झाला याची सखोल चौकशी करण्यात येणार असल्याचे यवत पोलिस ठाण्याचे निरीक्षक नारायण देशमुख यांनी सांगितले.

